# अमृत कुंभ

ऑगस्ट-सप्टेंबर २०१५

## मुखपृष्ठाविषयी

दादी प्रकाशमणीजींचे जीवन कोहिनूर हिऱ्याप्रमाणे होते. हिऱ्याला जसे अनेक पैलू असतात; त्यामुळे वेगवेगळ्या बाजूने त्याकडे पाहिल्यास वेगवेगळी चमक वा रंग दिसून येतात. तसेच दादीजींच्या स्वभावाला देखील अनेक पैलू होते. त्या सर्व गुणांची खाण व १६ कला संपूर्ण होत्या. त्यांच्यात प्रशासन कला, शिकविण्याची कला, नेतृत्व कला, पालना करण्याची कला, पत्रलेखनाची कला, मधुर बोलण्याची कला, स्वस्थ राहण्याची कला, परिवर्तन करण्याची कला, सामावून घेण्याची कला, सर्वांना स्नेह देण्याची कला... अशा १६ कला होत्या. म्हणूनच स्नेहमयी, वात्सल्यमूर्त, हिरेतुल्य दादीजी सर्वांनाच अतिप्रिय होत्या. हाच भाव मुखपृष्ठावरील चित्रात दर्शविण्यात आला आहे.

आदरणीय दादीजी सन १९६९ ते २००७ या ३८ वर्षाच्या कालखंडात संस्थेच्या मुख्य प्रशासिका होत्या. या काळात सुमारे १३३ देशातून ८५०० पेक्षाही अधिक सेवाकेंद्रे उघडली गेली. फलस्वरूप आपली ही संस्था खऱ्याअर्थी 'विश्व-विद्यालय' म्हणून नावारूपाला आली. दादीजी त्याग-तपस्या-सेवेची साक्षात मूर्ती होत्या. दि. २५ ऑगस्ट २०१५ रोजी दादीजींच्या ८ व्या स्मृतिदिनानिमित्त विश्वभरातील आम्हा सर्व ब्रह्मावत्सांचे कोटी-कोटी प्रणाम!

**- प्रकाशक अमृतकुंभ**

## अंतरंग






१. दादी प्रकाशमणीजींचे अमृत वचन............................२
२. प्रेरणामूर्त दादी प्रकाशमणीजी (संपादकीय)..................३
३. ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था........................५
४. रक्षाबंधनाचे पावन पर्व..........................................७
५. वर्णमालेत गवसले जीवनमर्म..................................९
६. आरोग्य भावनांचे...............................................१२
७. सचित्र सेवावृत्त..................................................१५
८. श्रीकृष्ण जन्माष्टमी.............................................१९
९. राजयोगाद्वारे स्वस्थ आणि संपन्न समाज...................२१
१०. सेवेत वृद्धी करण्याची विधी..................................२२
११. खरा कुंभमेळा...................................................२३
१२. संगमयुगी ब्राह्मण जीवनाची अंतिम स्थिती-कर्मातीत.....२४
१३. मनाला सुमन बनवा............................................२९
१४. भक्तीचे फळ ज्ञान, मज लाभले..............................३१

**फोटो, लेख, आदी पाठविण्याचा पत्ता :** संपादक - अमृतकुंभ, द्वारा : प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३, फोन : ०२२-२५३२२२०८. मोबाईल : ९८२००२३०९२
E-mail :info@amrutkumbh.com • **वर्गणी पाठविण्याचा पत्ता :** बी.के.गोदावरी, **प्रकाशक अमृतकुंभ द्वारा :** प्रजापिता ब्रह्माकुमारीज्, ए-१०, वर्षा अपार्टमेंट, छत्रपती शिवाजी सोसायटी, कोपरी कॉलनी, ठाणे (पूर्व) - ४००६०३.

प्रजापिता ब्रह्मा कुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाचे मुखपत्र 'अमृतकुंभ' द्वैमासिक मुद्रक व प्रकाशक बी.के.गोदावरी यांनी परफेक्ट प्रिंट, २२ ज्योति इंडस्ट्रियल इस्टेट, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे (पश्चिम) - ४००६०१ येथे छापून प्रजापिता ब्रह्माकुमारीज, लाईट हाउस, वागळे इस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४००६०४ येथे प्रसिद्ध केले - संपादक ब्र.कु.शिवाजी चौधरी. • संगणक अक्षरजुळवणी : मीडिया आर ॲण्ड डी प्रा. लि. १३, अमृत मधुरा, प्लॉट ३, सेक्टर ३, आरएससी २८, चारकोप, कांदिवली (प) मुंबई – ४०० ०६७

वार्षिक वर्गणी रु.६०/- • अर्धवार्षिक वर्गणी रु.३०/- • आजीव सभासद वर्गणी रु.१,३००/-
E-magazine साठी पुढील संकेतस्थळाला (वेबसाईटला) भेट द्या www.amrutkumbh.com



# दादी प्रकाशमणीजींचे अमृत वचन

## (निश्चय बुद्धी बनून प्रत्येक विषयात विजयी बना)

**आपल्या हातून कोणतेही अपवित्र कर्म होता कामा नये. त्यामुळे आपण प्रत्येकाने हा पुरुषार्थ केला पाहिजे की उद्या जर माझे शरीर सुटले तर माझी स्थिती बापसमान बनली आहे का?**

निश्चय बुद्धी असाल तर सदा विजय निश्चित आहे. असे नाही की एका विषयात विजयी आणि दुसऱ्यात फेल. त्यांना काही पास मार्कस् मिळणार नाहीत. लौकिक कॉलेजात सुद्धा जे सर्व विषयात पास होतात, तेच पास घोषित केले जातात. आपले मुख्य ३ विषय आहेत- मनसा, वाचा व कर्मणा. जेव्हा आपण पक्का निश्चय करतो की 'मी शिवबाबांचा व शिवबाबा माझे' तेव्हा जर आपण कुठलेही अयथार्थ कर्म केले, काही चूक केली तर लोक हेच म्हणतात की ''हे तर स्वतःला ब्रह्माकुमार, ब्रह्माकुमारी म्हणवतात परंतु यांची वागणूक पाहा, कशी आहे!'' तर कोणाची इज्जत गेली? बापदादांची. **त्यामुळे सदैव लक्षात ठेवा की निश्चय बुद्धी अर्थात विजयी. तसेच विजयी बनणे अर्थात आपली स्थिती बापसमान बनविणे. बापसमान स्थिती म्हणजे निराकारी, निर्विकारी व निरहंकारी स्थितीत राहणे.**

शिवबाबांनी आपल्याला हे काम दिले आहे की मायाजीत बनण्यासाठी निराकारी स्थिती बनवा. नंतर निर्विकारी व निरहंकारी बना. त्यामुळे प्रत्येकाला निराकारी स्थिती बनविण्यासाठी खूप मेहनत केली पाहिजे; कारण निराकारी स्थितीच आपल्याला कर्मातीत बनवेल. **निराकारी स्थितीद्वारे महत्त्वपूर्ण ३ फायदे होतात. पहिला म्हणजे निराकारी स्थितीद्वारे आपल्या संस्कारांवर आपण सहज विजयी बनतो. दुसरा म्हणजे निराकारी स्थिती वायुमंडळ, वातावरणात शांतीची शक्ती पसरविते. तिसरा म्हणजे निराकारी स्थिती आपल्याला संपूर्ण निर्विकारी बनवते.** ही स्थिती कर्म, विकर्म यावर विजयी बनवून, अकर्मी बनवते. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या स्थितीचे रेकॉर्ड ठेवले पाहिजे. तसेच हे चेक केले पाहिजे की मी व्यर्थ संकल्पांवर विजय प्राप्त केला आहे का? अजूनही जर व्यर्थ संकल्प येत असतील तर समजावे की, मी श्रीमतावर चालत नसून, मनमतावर चालत आहे.

जर आपल्याला निराकारी व निर्विकारी स्थितीत रहायचे असेल तर आपल्या संकल्पातही माया (अर्थात विकार) येता कामा नये. आपल्या हातून कोणतेही अपवित्र कर्म होता कामा नये. त्यामुळे आपण प्रत्येकाने हा पुरुषार्थ केला पाहिजे की उद्या जर माझे शरीर सुटले तर माझी स्थिती बापसमान बनली आहे का? त्यामुळे आपल्याला हे सूक्ष्म चेकींग केले पाहिजे की कधीही व्यर्थ संकल्प, व्यर्थ बोल व व्यर्थ कर्म होता कामा नये तसेच समयसुद्धा व्यर्थ जाता कामा नये. रोज अमृतवेळेला स्वतःमध्ये इतकी शक्ती भरा की ती शक्ती दिवसभर अनेक कार्य करताना, मदत करेल. त्यासाठी रोज अमृतवेळेला उठून शिवबाबांशी वार्तालाप (रूहरिहान) करा. त्यांच्यापासून प्रेरणा व शक्ती प्राप्त करा तसेच दिवसभर निराकारी स्थितीत राहण्याची मेहनत करा. प्रत्येक तासाला आपला चार्ट पाहा. **तात्पर्य म्हणजे आता समयानुसार आपली स्थिती बापसमान बनवा. चेकींग करण्यासाठी आपल्यासमोर फार मोठे साधन आहे. ते म्हणजे 'सी फादर'.** साकार रूपाने पिताश्री ब्रह्माबाबा जरी आता आपल्या समोर नसले तरी अव्यक्त रूपाने ते आपल्या समोर आहेत. त्यांची फरिश्ता स्थिती आपल्यासमोर आहे. त्यांच्यासारखी आपलीही फरिश्ता स्थिती असेल तर दुसऱ्यांनाही आपण फरिश्ता बनण्याची प्रेरणा देऊ शकू. हाच तो संगमयुगाचा हिरेतुल्य समय आहे जेव्हा आपला श्रेष्ठ पुरुषार्थ पाहून, अनेकांना प्रेरणा प्राप्त व्हावी अशा प्रकारची प्रेरणा मिळेल तेव्हाच आपल्याला अनेकांकडून आशीर्वाद (दुवा) प्राप्त होतील. आशीर्वाद मिळतातच मुळी आपली श्रेष्ठ स्थिती पाहून, त्यामुळे अमृतवेळेपासून रात्रीपर्यंत आपल्याला प्रत्येकाकडून आशीर्वाद मिळत रहावेत, यासाठी फरिश्ता स्थितीत राहा.

**शिवबाबा सदैव हेच सांगतात; की ''मुलांनो, कर्म असे करा, जे पाहून लाखो आत्म्यांना प्रेरणा प्राप्त होईल.'' त्यामुळे कधीही स्वतःला गृहस्थी समजू नका. शिवबाबांचे बनलात अर्थात गृहस्थी जीवन पूर्ण झाले. 'माझे शिवबाबा म्हणणे अर्थात समर्पण होणे. अशी समर्पित मुलेच आपल्या निराकारी व नष्टोमोहा स्थितीद्वारे अनेकांना प्रेरणा देण्यासाठी निमित्त बनतात.'** ■

संपादकीय...

# प्रेरणामूर्त दादी प्रकाशमणीजी

दादी प्रकाशमणीजी अशी एक महान विभूती होती की जिचे जीवन एखाद्या खुल्या पुस्तकाप्रमाणे होते. त्यांच्या जीवनाचे प्रत्येक पान हे उमंग-उत्साह, साहस, समर्पण, सत्यता, मधुरता, वात्सल्य... यांनी भरलेले होते. बोल व कर्म (कथनी व करनी) यांच्यातील समानतेमुळे त्यांचे जीवन सर्वांसाठी आदर्श, उदाहरणमूर्त व प्रेरणादायी बनले होते. दादीजींच्या डोळ्यात आत्मीयता, वाणीत मधुरता व कर्मात कुशलता होती. त्या जणू साधेपणा व स्वच्छता यांनी शृंगारित प्रतिमूर्ती होत्या. **त्याग व तपस्येच्या जोरावर त्यांनी आपल्या जीवनाला 'लाईट हाऊस' व 'माइट हाऊस' बनवले होते. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ आबू रोड येथील शांतिवनमध्ये उभारण्यात आलेला 'प्रकाशस्तंभ' आजही विश्वातील अनेक आत्म्यांना ज्ञानप्रकाशाने प्रकाशित करीत आहे. तसेच सर्वांना आपले जीवन महान बनविण्याची प्रेरणा देत आहे.**

## दादीजींच्या अलौकिक जीवनाची वाटचाल

सन १९२२ मध्ये दादीजींचा जन्म झाला. वयाच्या १४ व्या वर्षी म्हणजे सन १९३६ मध्ये सिंध हैदराबाद येथील 'ओम मंडलीत' एक आज्ञाधारक, स्नेहमयी कुमारी म्हणून दादीजींचे पदार्पण झाले. त्यावेळी 'ओम मंडली'ची नुकतीच सुरुवात झाली होती. (पुढे 'ओम मंडळीचे' नाव प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय असे ठेवण्यात आले) दादीजींच्या हृदयात ईश्वर तसेच ईश्वरी परिवाराविषयी अतिशय प्रेम होते. त्यामुळे पिताश्री ब्रह्माबाबांनी त्यांना यज्ञातील लहान मुलांचे टीचर म्हणून पदभार दिला. त्यांनी ही भूमिका अतिशय उत्तम प्रकारे बजावली. **दादीजी आपल्या जीवनातील प्रत्येक कर्म, मग ते स्थूल असो वा सूक्ष्म असो, अतिशय कुशलतापूर्वक करीत असत. त्यामुळे त्यांचे मन-वचन-कर्म सदैव विशेषता संपन्न होते. त्यात जरासुद्धा साधारणता नव्हती.** बाबांनी दिलेले निर्देश, श्रीमत अथवा इशारे त्या उत्तम प्रकारे ग्रहण करीत असत व लगेचच त्याची पूर्तता देखील करीत. त्यामुळे दादीजी सर्व यज्ञवत्सांकरिता मार्गदर्शिका बनल्या होत्या.



सन १९५० मध्ये जेव्हा 'ब्रह्माकुमारीज्' ही संस्था माउंट आबू येथे स्थानांतरित झाली तेव्हा तेथील भौगोलिक परिस्थिती, वातावरण, बेगरी पार्ट अशा अनेक गोष्टी परीक्षेच्या रूपाने आल्या. परंतु दादीजी मात्र सर्व परिस्थितीत अचल-अडोल होत्या. त्यांच्या मनात कधीही व्यर्थ संकल्प उत्पन्न झाला नाही. ईश्वरी सेवेच्या क्षेत्रात देखील त्या जेथे-जेथे गेल्या, तेथे-तेथे त्यांनी स्थापनेचा नवा इतिहास रचला. कानपूर, लखनौ, पटना, मुंबई इत्यादी अनेक ठिकणी, अनेकानेक आत्म्यांना ईश्वरी जन्मसिद्ध अधिकार प्राप्त करून देण्यासाठी त्या निमित्त बनल्या.

सन १९६९ मध्ये पिताश्री ब्रह्माबाबा अव्यक्त झाल्यानंतर, दादीजींनी ब्राह्मण परिवाराचा संघटनरूपी किल्ला मजबूत केला. सर्वांना धैर्य, आशा व उमंग-उत्साहाचा पाठ शिकवला. ब्राह्मण परिवारात आंतरिक स्नेहभाव वृद्धिंगत केला. पिताश्री ब्रह्माबाबा अव्यक्त झाल्यानंतर, कित्येकांच्या मनात हा प्रश्न होता की आता मुरली कोण ऐकवेल? त्यावर शिवबाबांनी स्पष्ट केले की दादी प्रकाशमणी मुरली ऐकवेल व जुन्या मुरल्यांची पुनरावृत्ती केली जाईल. खरोखर दादीजी इतक्या सुंदर रितीने मुरली ऐकवित की सर्वांना साकार बाबांची भासना होत असे. यावरून आपल्या लक्षात येईल की जसे शिवबाबा, ब्रह्माबाबांच्या आधारे सेवा करतात, तशाच दादीजी देखील शिवबाबांच्या माध्यम बनल्या. ब्रह्माबाबांच्या आकारी शरीराद्वारे तसेच दादीजींच्या साकार शरीराद्वारे शिवबाबांनी सेवेचे कार्य करविले. म्हणूनच दादीजी अव्यक्त बापदादांचा तसेच मधुबनचा शृंगार होत्या.

## दादीजींच्या सेवेची महानता

**दादी प्रकाशमणीजी जेव्हा संस्थेच्या मुख्य प्रशासिका होत्या. (सन १९६९ ते २००७ या ३८ वर्षाच्या कालखंडात) तेव्हा विश्वभरात १३३ देशात ८५०० हून अधिक सेवाकेंद्रे उघडली गेली. तसेच ८ लाखापेक्षाही अधिक बंधुभगिनी राजयोगी बनले.** (सन १९६९ मध्ये केवळ १३० सेवाकेंद्रे होती.) फलस्वरूप आपली ही संस्था खऱ्या अर्थी 'विश्व विद्यालय' म्हणून नावारूपाला आली. येथे सर्व धर्म, जाती, पंथ तसेच

**त्याग व तपस्येच्या जोरावर त्यांनी आपल्या जीवनाला 'लाईट हाऊस' व 'माइट हाऊस' बनवले होते. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ आबू रोड येथील शांतिवनमध्ये उभारण्यात आलेला 'प्रकाशस्तंभ' आजही विश्वातील अनेक आत्म्यांना ज्ञानप्रकाशाने प्रकाशित करीत आहे.**

संस्कृती वा मान्यता असणाऱ्या बंधुभगिनींचा समावेश झाल्याने, निराकार शिव परमात्मा हा सर्व आत्म्यांचा पिता आहे, विश्वपिता आहे याची प्रत्यक्षता झाली. त्यामुळेच 'एक ईश्वर, एक विश्व परिवार' ही भावना मूर्त स्वरूपात आली. आपण सर्व एक परमात्मा शिव पित्याची मुले, आपापसात भाऊ-भाऊ आहोत. ही बंधुत्वभावना जागृत व्हायला मदत झाली. दादीजींच्या या महान कार्याची आपण जेवढी महती गावी, तेवढी थोडीच आहे. कारण स्वयं परमात्मा शिव पिता (शिवबाबा) त्यांची महानता वर्णन करीत असत. त्या अनुषंगाने दादीजींच्या अमृत महोत्सवानिमित्त (वयाच्या ७५ व्या वर्षानिमित्त) अव्यक्त बापदादांनी (शिव पिता व ब्रह्मा दादा) सूक्ष्म वतनमधून जो संदेश पाठविला होता, तो अतिशय उद्‌बोधक व प्रेरणादायी असा आहे.

## प्रभु रत्न दादीजी

बापदादांनी वतनमध्ये दादीजींना इमर्ज करून, त्यांच्या गळ्यात हिऱ्यांच्या ६ माळा घातल्या होत्या. त्या माळांमध्ये अतिशय सुंदर रितीने पुढील ६ गोष्टी लिहिल्या होत्या.

१. **विश्व कल्याणाची सेवा करण्यात व करवून घेण्यात सफलता मूर्त.**
२. **ब्राह्मणांची स्नेहयुक्त पालना करून, सर्वांची उन्नती करणारी.**
३. **सदैव उमंग-उत्साहात राहणारी व सर्वांना उमंग-उत्साहात आणणारी सेवाधारी**
४. **सदा गुणसंपन्न स्वभाव, मनमिळाऊ व नम्रतेच्या संस्काराद्वारे सेवा.**
५. **आपल्या सर्व सेवासाथींना स्नेह व सन्मान देण्याची सेवा.**
६. **सतत मुरली व मुरलीधर शिवबाबांचे महत्त्व राखणे तसेच दुसऱ्यांनीही तसे ते राखावे, याची सेवा.**

अशा ६ माळा बापदादांनी दादीजींना घातल्या होत्या. फलस्वरूप दादीजींचे अंतः करण अत्यानंदाने भरून गेले होते. **आपण सर्वांनी दादीजींचे हे गुण वा विशेषता धारण करण्याचा तीव्र पुरुषार्थ केला पाहिजे. दादीजी खरोखर प्रभुरत्न होत्या.** त्यांच्या मस्तकावर अनेक जबाबदाऱ्यांचा मुकुट होता. परंतु जितक्या अधिक जबाबदाऱ्या होत्या तितक्याच 'डबल लाइट' बनून, त्यांनी आपला पार्ट बजावला. त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली शिवशक्ती सेनेच्या विजयाचा झेंडा विश्वभरात फडकला. विश्वसेवेसाठी त्यांनी आपला देह जणू चंदनाप्रमाणे झिजवला. त्यांच्याविषयी एका कवीने अतिशय सुंदर शब्दात म्हटले आहे-

**सेवाभावी राजयोगिनी,**
**वात्सल्यतेची मूर्ती।**
**ज्ञानामृत पाजूनी सकळा,**
**केली सेवा पूर्ती।**
**'युनो' ने ही केले सन्मानित,**
**सेवा ती पाहून।**
**शिवयज्ञाच्या सेवेसाठी,**
**झिजले जणू चंदन।**

## दादीजींनी आपले नाव सार्थ केले

दादीजींचे नाव प्रकाशमणी होते. ज्याप्रमाणे एखाद्या मणीची चमक कधी लपून राहात नाही. तो सदैव प्रकाश वा लाइट देण्याचे कार्य करतो; त्याप्रमाणे दादीजींनी देखील विश्वातील सर्व आत्म्यांना ज्ञानप्रकाश देण्याचे कार्य केले. त्यामुळे जसे त्यांचे नाव होते तसेच त्यांचे कामही होते. दादीजींमध्ये अनेक मणी सामावलेले होते. मुख्य म्हणजे त्या संतुष्टमणी, मस्तकमणी, सफलता मणी... होत्या. त्या सदैव देहमुक्त (अर्थात विदेही वा आत्मिक स्थिती) तसेच जीवनमुक्त अर्थात जीवनात सदैव खुशीचा अनुभव करीत असत. शिवबाबांनी दादीजींना समानतेचे वरदान दिले होते. त्यामुळे सर्वांना असा अनुभव होत असे की दादीजींच्या सोबत राहणे म्हणजे शिवबाबांच्या सोबत राहणे; दादीजींशी वार्तालाप करणे म्हणजे परमात्मा पित्याशी वार्तालाप करणे; दादीजींकडून दृष्टी घेणे म्हणजे एखाद्या देवदूताकडून दृष्टी घेणे, **दादीजींना पाहताच बाबांची आठवण होत असे. कारण त्या बापसमान उदाहरण मूर्त बनल्या होत्या. दादीजींच्या रोम-रोमात बाबा होते. त्यामुळेच त्या सर्वांना रोम-रोमात शिवबाबांची स्मृती (याद) देण्यासाठी निमित्त बनल्या. सर्वांना उमंग-उत्साह देण्यात दादी नंबर वन होत्या. स्वयं बापदादा देखील दादीजींना पाहून अतिशय खुश होत असत.**

जसे लौकिकमध्ये एखादा मुलगा व बाप यांच्यात इतकी समानता असते की आपण म्हणतो, हुबेहुब बापाचीच कॉपी आहे. अशाच प्रकारची अलौकिक समानता काही विशेष आत्मे व परमात्मा यांच्यात संगमयुगात दिसून येते. परमात्मा पित्याचे जे रूप, गुण व कर्तव्य तेच अष्ट रत्नांचे (अथवा वैजयंती माळेतील १०८ आत्म्यांचे) पाहायला मिळते. अशा अष्ट रत्नात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करणाऱ्या दादीजी होत्या. त्यांच्या प्रत्येक संकल्प, बोल व कर्मात पवित्रता अनुभवाला येत होती. त्यांचे प्रत्येक पाऊल हे विश्वकल्याणासाठी होते. त्यांनी तीव्र पुरुषार्थाद्वारे कर्मातीत व बापसमान फरिश्ता स्थिती प्राप्त केली होती.

**अशा प्रेरणामूर्त, त्याग-तपस्या-सेवामूर्त, बापसमान संपन्न व संपूर्ण दादीजींनी २५ ऑगस्ट २००७ रोजी (वयाच्या ८५ व्या वर्षी) आपल्या नश्वर देहाचा त्याग केला व त्या अव्यक्त वतनवासी बनल्या. त्यांच्या ८ व्या स्मृतिदिनानिमित्त संपूर्ण विश्वातील आम्हा सर्व ब्रह्मावत्सांचे कोटी-कोटी प्रणाम।**

**– ब्रह्माकुमार शिवाजी**

■

(भाग ७)

# ईश्वरी कार्यव्यवहारात आदर्श व्यवस्था संपन्न करण्याची आवश्यकता

**- ब्र.कु. रमेश शाह, गावदेवी, मुंबई**

परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे. आणि या परिवर्तनानुसार सत्ययुग, त्रेतायुग, द्वापारयुग, कलियुग आणि मग संगमयुगाच्या रूपामध्ये हे सृष्टिचक्र फिरत असते. जीवनाच्या व्यवहारातही बाल, युवा, वानप्रस्थ त्यानंतर संन्यास अशाप्रकारे अवस्था बदलत असतात. जर स्त्री असेल तर प्रथम कन्या, पत्नि, माता मग सासू बनते. निसर्गातही असेच होते जसे समुद्राच्या पाण्यात सुर्यकिरणांमुळे बाष्प होऊन, पुन्हा तेच पाणी पावसाच्या रूपाने नदीत जाते आणि पुढे समुद्रात जाऊन मिळते. अशाप्रकारे निसर्गाचे चक्र चालू राहते.

शिवबाबांनीसुद्धा विभिन्न प्रकारचे परिवर्तन घडवून आणले आहे. ब्रह्माबाबा प्रथम हैदराबाद येथे राहत होते आणि मग मुंबई मधुन पुढे कलकत्याला गेले. आणि पुन्हा परत हैदराबादला येऊन त्यांनी ईश्वरी विश्व विद्यालयाची स्थापना केली. ईश्वरी विश्व विद्यालयसुद्धा सिंध-हैदराबादहून कराचीला आले, व मग १९५० मध्ये माऊंट आबू येथे स्थानांतरित झाले. त्यानंतर आपण जाणतो की, हळूहळू दिल्ली, मुंबई, कर्नाटक येथे सेवाकेंद्र उघडत गेले आणि भारतात सेवेचा विस्तार होत गेला. पुढे १९७१ नंतर परदेशात ईश्वरी सेवेला प्रारंभ झाला.

स्थापनेच्या सुरुवातीला ब्रह्माबाबांच्या मुखाद्वारे शिवबाबांनी सर्व मुलांना ईश्वरी ज्ञान आणि यज्ञ संचालनार्थ आदरणीय दादी प्रकाशमणीजी आणि दीदी मनमोहिनी जी निमित्त बनल्या. तसेच आदरणीय दादी गुलजारजी यांना बापदादांच्या रथाच्या रूपात निमित्त बनविले. १९७४ पासून दादी जानकीजी यांना परदेशातील सेवा आणि संचालन करण्यासाठी निमित्त बनविले. अशाप्रकारे ईश्वरीय सेवा आणि यज्ञ संचालनाच्या कारभाराचे विभाजन होऊन, आवश्यक ते परिवर्तन घडून आले.

दादी जानकीच्या म्हणण्यानुसार, दादी प्रकाशमणीजीने यज्ञ संचालनासाठी भ्राता निर्वैरजी, भ्राता बृजमोहनजी तथा मला मॅनेजमेंट कमिटीमध्ये मदतीसाठी सामावून घेतले. त्याप्रकारे आम्ही तिन्ही भाऊ यज्ञ संचालन सेवेसाठी निमित्त बनलो. आदरणीय दादी प्रकाशमणीजी अव्यक्त झाल्यानंतर दादी जानकीजी ईश्वरी विश्व विद्यालयाच्या मुख्य प्रश्वासिका बनल्या. शिवबाबांनी त्यांना दोन्ही सेवेची जबाबदारी दिली. देश व विदेशाची सेवा व व्यवस्था संचालनार्थ दादी जानकीजी या सेतु बनून सेवा करीत आहेत.

दादीजी अव्यक्त झाल्यानंतर दादी जानकीजी यांनी हळूहळू ईश्वरी सेवेचे विभाजन केले. दादी व तमाम भगिनींनी ज्ञान प्रसार आणि प्रशासनाचे कार्य सांभाळले आणि आम्हा तिन्ही वरिष्ठ भ्रातांकडे यज्ञ संचालनाचे कार्य सोपविले. यासाठी अव्यक्त बाबदादाने आम्हाला इशारा दिलेला होताच; परंतु दि. १५ मार्च २०१४ रोजी आम्हा तिन्ही भावांना आमच्या सेवेच्या जबाबदारीची आठवण देत आम्हाला संस्कार मीलनाचे असे कार्य करायला सांगितले की, आम्ही जणू तिघे नसून, संस्कारामध्ये एक आहोत. त्याचबरोबर यज्ञातील साथी-सोबतींना सहकार्य करण्यासाठी सुचक प्रेरणाही दिली.

मी येथे एक गोष्ट सांगू इच्छितो की, सन १९७३ पर्यंत यज्ञ कार्यव्यवहारामध्ये जमाखर्च लिखाणाची आवश्यकता नव्हती कारण कायद्याअंतर्गत संस्थांसाठी जमा खर्च उपलब्ध करण्याची काही तरतूद नव्हती पण १९७३ पासून भारत सरकारने सर्व संस्थांसाठी कायदा बनविला तेव्हापासून यज्ञात जमाखर्च लिहिण्याचे कार्य सुरू झाले. प्रथम मी आणि दादा विश्वरतनजी विशाल भवनाच्या खोली क्र. १८ मध्ये बसून सर्व हिशेब लिहित असू. काळ बदलत गेला आहे. प्रथम आम्ही बहिर्णींना जमाखर्च कसा लिहायचा हे शिकविले. आणि आता बहिणी त्यात इतक्या प्रवीण झाल्या की कुणी बी.कॉम शिकलेली व्यक्ती अकाऊंन्टंटचे कार्य करीत असावी. त्यानंतर यज्ञामध्ये संगणकाद्वारे अकाऊंटचे कार्य सुरू झाले. त्यामुळे ज्या बहिणी उमंगउत्साहाने संगणक शिकल्या, त्यांना हा जमाखर्च ठेवणे खूप सोपे जाऊ लागले. मी नेहमी सांगतो की, विसाव्या शतकात ज्यांना अक्षरज्ञान नाही ते अशिक्षित म्हटले जात, परंतु एकविसाव्या शतकात जर संगणक येत नसेल तर ते अडाणी आहेत. त्यानंतर संगणक मधील जमाखर्च लिहिण्याच्या प्रक्रियांमध्ये आणखी

**ब्रह्माबाबा प्रथम हैदराबाद येथे राहत होते आणि मग मुंबई मधुन पुढे कलकत्याला गेले. आणि पुन्हा परत हैदराबादला येऊन त्यांनी ईश्वरी विश्व विद्यालयाची स्थापना केली.**



नवीन तंत्रज्ञान उपयोगात आणले गेले आणि आता तर कनेक्ट वन (Connect one) असा एक प्रोग्राम आहे त्यात सारा संगणकाचा जमाखर्च लिहिण्यात येत आहे. पूर्वी बहिणी जमाखर्चासाठी दरमहा एक फॉर्म भरीत असत. मग, तो मधुबनला पाठविण्यात येत असे. परंतु 'कनेक्ट वन' प्रोग्राममुळे कार्य इतके सोपे झाले की, बहिणी आपल्या जागीच जमाखर्च संगणकामध्ये टाईप करतात, तो हिशोब मधुबनमधील अकाऊंट ऑफिसमध्ये त्याचवेळी टाईप होत जातो. आज आम्ही अभिमानाने म्हणू शकतो की, ब्रह्माकुमारीजच्या अकाऊंटचा कारभार विश्वस्तरीय झालेला आहे!

जसे ज्ञानानुसार आपल्याला सांगण्यात आले आहे की, काम, क्रोध, लोभ, मोह व अहंकार बरोबर आळस हा सुद्धा सहावा विकार आहे. त्याचप्रमाणे बाबांनी दिलेल्या ज्ञानानुसार जे चार स्तंभ आहेत. ज्ञान, योग, धारणा व सेवा, तसेच व्यवस्थापन (Management) सुद्धा पाचवा स्तंभ आहे, जो शिकणे अतिशय जरूरीचे आहे.

व्यापारामध्ये प्रगती करण्यासाठी वा त्यात प्राविण्य मिळविण्यासाठी हॉर्वर्ड, ऑक्सफोर्ड, केंब्रिज इ. विश्वविद्यालयामध्ये मॅनेजमेंटचे अनेक कोर्सेस शिकवितात. जे भारतामध्ये एम.बी.ए (Master of Business Administration) म्हणून नावाजले जातात. पुढे जगातील अनेक कंपन्यांनी ठरविले की, कंपनी मॅनेजरकडे एम.बी.ए. ची डिग्री असणे आवश्यक आहे. ज्याप्रकारे **लौकिक दुनियेत मॅनेजमेंट शिकणे जरूरी आहे. त्याप्रमाणे शिवबाबांच्या कारभारामध्ये देखील मॅनेजमेंट शिकणे गरजेचे झाले आहे. अशाप्रकारे कार्यव्यवहार करणाऱ्यांना आपल्या येथे एम.डी.ए.** (Master of Divine Administration) **म्हणू शकतो. जे याप्रकारे यज्ञकार्य व्यवहारामध्ये प्रवीण** (Expert) **बनतील तेच भविष्यातील सुसंचालित राज्य प्रशासनाचा कारभार करू शकतील.**

अव्यक्त बापदादांनी दि. १५-३-२०१४ च्या मुरलीत म्हटले होते की, दिल्ली हे भविष्यातील विश्व राज्याचे प्रमुख स्थान असेल आणि तेथे श्री लक्ष्मी, श्रीनारायण राज्य करतील. नंतर प्रिय बाबा असे म्हणाले की, आता जितके अवस्थेनुसार बाबांच्या जवळ असाल तितके तेथेही परिवाराच्या समीप असाल. अशाप्रकारे बापदादांनी अवस्था आणि व्यवस्था यांच्यामध्ये जो श्रेष्ठ संबंध असतो तो स्पष्ट केला आहे.आता आपल्याला पुरुषार्थाद्वारे आपली अवस्था उच्च करीत असताना, व्यवस्थापनाची कला ही शिकावी लागेल.

प्रिय बापदादांनी 'जशी अवस्था, तशी व्यवस्था' हे सत्ययुगी दनियेसाठी म्हटले आहे. अवस्था आत्म्याच्या स्थितीसाठी म्हटले आहे आणि त्या अवस्थेनुसार तेथील व्यवस्था असेल. म्हणजेच तेथे आत्म्याची अवस्था संपूर्ण पवित्र असल्याने तेथील निसर्ग, मनुष्य विश्वातील सर्वकाही १०० टक्के संपूर्ण (Perfect) असेल. बाबांनी आपल्याला आदर्श व्यवस्थापन आणि आदर्श व्यवहार करायला शिकविले आहे. त्यासाठी ते दैवी परिवारामध्ये आपल्याला निमित्त बनायला शिकवित आहेत त्यामुळे आपल्याला व्यवस्थापनाची कला शिकायलाच हवी. त्याकडे आपण दुर्लक्ष करून चालणार नाही.

आपले पिताश्री ब्रह्माबाबा, मातेश्वरीजी, दादी प्रकाशमणीजी, दीदी मनमोहिनीजी इ. ॲडवान्स पार्टीच्या पूज्य आत्म्यांनी केलेले व्यवस्थापन आपण पाहिलेले आहे. या सर्वांच्या कुशल निपूण कार्यव्यवहारामुळेच मागील केवळ ७८ वर्षाच्या काळात ईश्वरी विश्व विद्यालयाचा एवढा विस्तार झाला आहे. त्याचे मुख्य कारण हेच आहे की, यामागे कर्ता-करविता परमपिता परमात्मा आहेत. ते सदैव आम्हाला मार्गदर्शन करीत आहेत आणि सदैव मदत करण्यास तत्पर आहेत. आवश्यकता फक्त या गोष्टीची आहे की, परमात्म्याच्या श्रेष्ठ कार्यामध्ये आपण निमित्त बनण्याची. परमात्माच्या श्रीमतानुसार आणि कुशल व्यवस्थापनाच्या आधारे आपण जर संगमयुगी कारभार केला तर भविष्यात ही श्रेष्ठ पदाची प्राप्ती नक्कीच करू शकू.

**या लेखाचा मुख्य उद्देश हाच आहे की, शिवबाबा आता आपल्या सर्व मुलांमध्ये 'अवस्था' बरोबरच 'व्यवस्था' शक्ती निर्माण करीत आहेत याची जाणीव करून देणे. पुरुषार्थ अनुसार अवस्था आणि अनुभवाच्या आधारे व्यवस्था शिकवित आहेत. ईश्वरी सेवेत अवस्था आणि व्यवस्थेच्या आधारे विश्व परिवर्तनाचे कार्य करावे लागेल. त्यासाठी जे निमित्त बनतील त्यांच्या हाती विश्वाच्या राज्याचा कार्यव्यवहार असू शकतो.**

विश्वाच्या कार्यव्यवहारासाठी म्हणजे Master of Divine Administration साठी कोणत्या आवश्यक योग्यता असणे गरजेचे आहे हे मी पुढील लेखांमध्ये स्पष्ट करीन. त्या योग्यता धारण करून आपण विश्व कार्यव्यवहारात पारंगत बनू शकतो. तात्पर्य म्हणजे ज्याप्रमाणे भगिनींनी जर्माखर्चाच्या विषयाबाबत बी.कॉम. डिग्रीपर्यंत चा सराव केलेला आहे. आणि अकाऊंटस् लिहिण्यासाठी संगणकाचे ज्ञानही आत्मसात केलेले आहे. त्याप्रमाणे माझी अशी शुभकामना आहे की, आपण सर्व M.D.A (Master of Divine Administration) बनावेत म्हणजेच सत्ययुगी विश्वाच्या व्यवस्थेच्या कार्यव्यवहारात विशेष तज्ञ बनाल. आशा आहे की, माझी ही शुभभावना आपण सर्वजण अवश्य स्वीकार कराल.

- भावानुवाद :

**ब्र.कु. जयश्री खिलारी,**

**विक्रोळी, मुंबई**

■

# रक्षाबंधनाचे पावन पर्व

- ब्र.कु. लतिका, ठाणे

दरवर्षी श्रावणी पौर्णिमेला अथवा नारळी पौर्णिमेला रक्षाबंधनाचा सण मोठ्या आनंदाने भारतात सर्वत्र साजरा केला जातो. पौर्णिमेचा चंद्र हा परिपूर्णता व अमरत्वाचे प्रतीक आहे. तसेच श्रावण नक्षत्र देखील याचवेळी असते. त्यामुळे ऋतू आणि काळ यांच्या दृष्टीने रक्षाबंधन हे ब्राह्मणांचे प्रधान पर्व आहे. या सणाची आणखी एक विशेषता अशी आहे की ब्राह्मण देखील यजमानाला रक्षाबंधन बांधतो आणि बहीण सुद्धा आपल्या भावाला राखी बांधते. अशाप्रकारे या सणात बहीण व ब्राह्मण यांना समानता देण्यात आली आहे.

आपण सर्व हे जाणतो की ब्राह्मण हे सनातन धर्माचे प्रतिनिधी मानले जात होते. ते केवळ धार्मिक कार्यांचेच आयोजन करीत, त्यामुळे बहिणीच्याद्वारे भावाला राखी बांधण्याच्या परंपरेत देखील कुठले तरी धार्मिक प्रयोजन नक्कीच असेल. **वास्तविक धर्म या शब्दाचा अर्थ धारणा असा आहे. धर्म पवित्रतेची धारणा करण्याच्या विधी–विधानाला म्हटले जाते. त्यामुळे बहिणीद्वारे भावाला राखी बांधण्याचा मूळ उद्देश, प्रारंभी पवित्रतेची धारणा करण्याचा सूचक असाच होता. म्हणूनच गायन केले जाते – 'कन्या ही शंभर ब्राह्मणांपेक्षा उत्तम आहे.'** परंतु समयानुसार वर्ण व्यवस्था प्रचलित झाली व ब्राह्मण एक जात बनली. त्यामुळे रक्षाबंधन हे ब्राह्मण तसेच बहीण या दोघांच्याद्वारे केले जाऊ लागले.

## रक्षाबंधन हे पवित्रतेचे बंधन

रक्षाबंधनाचे महात्म्य धर्मशास्त्रातून पुढील प्रमाणे वर्णन केले आहे.

**सर्व रोगोपशमनं सर्वाशुभ विनाशनम्।**
**सकृत्कृतेनाब्दमेकं येन रक्षाकृतोभवेन ।।**

अर्थात रक्षाबंधन हे सर्व व्याधींचा नाश करणारे तसेच सर्व अशुभांचा नाश करणारे आहे. जो मनुष्य याचे अनुष्ठान करतो तो सर्व विकारांपासून मुक्त होतो. वास्तविक रक्षाबंधनाचा अर्थ आहे आपल्या आत्मस्थितीमध्ये अचल-अडोल राहून पूर्णत: पवित्रतेचे पालन करणे. त्याचबरोबर अन्य आत्म्यांनाही असे करण्यासाठी सहयोग देणे. रक्षाबंधन हे असे पवित्र बंधन आहे जे अनेक प्रकारच्या बंधनापासून आपली मुक्तता करते. म्हणूनच रक्षाबंधन पर्वाला



'विष तोडक पर्व' आणि 'पुण्य प्रदायक पर्व' असे पर्यायी शब्दप्रयोग केले जातात. 'विष तोडक पर्व' अर्थात विषय विकारांपासून मुक्त करणारे पर्व. तसेच 'पुण्य प्रदायक पर्व' पवित्रतेच्या धारणेने पुण्य प्रदान करणारे पर्व. याचा नेमका भावार्थ लक्षात येण्यासाठी आपण सृष्टिचक्राचे ज्ञान थोडक्यात पाहूया.

सृष्टिचक्र हे ५००० वर्षाचे असून ते अव्याहतपणे फिरत असते. (जसे दिवस–रात्रीचे कालचक्र, ऋतुचक्र फिरत असते.) त्यात सत्ययुग, त्रेतायुग, द्वापारयुग व कलियुग अशी चार युगे असून प्रत्येक युगाचा कालावधी १२५० वर्षांचा आहे. पहिल्या दोन युगात (सत्य व त्रेतायुगात) सर्व मनुष्यात्मे संपूर्ण पवित्र (अर्थात निर्विकारी) असतात. त्यांच्यात काम–क्रोधादी विकारांचा अंशही नसतो. त्यामुळे त्यांना स्वर्गाचे सुख व साम्राज्य प्राप्त होते. तसेच ते श्रेष्ठाचारी व दैवीगुण संपन्न असल्याने त्यांना देवी–देवता असे म्हटले जाते. त्यानंतर द्वापारयुगात देवी–देवता वाममार्गात जातात. अर्थात् त्यांच्यात विकारांची प्रवेशता होते. काम–क्रोधादी विकारांशी (अर्थात असुरांशी) देवता पराभूत झाल्याने, त्यांना आपले स्वर्गाचे राज्यभाग्य गमवावे लागते. **आता कलियुगाच्या अंती (संगमयुगात) परमपिता शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्माद्वारे ईश्वरी ज्ञान व सहज राजयोग शिकवितात. तसेच पतितांना पावन बनविण्यासाठी पवित्रतेची राखी बांधतात. ही राखी जे बांधतात त्यांना पुन्हा देव पदाची प्राप्ती होते अर्थात गमावलेले स्वर्गाचे राज्य पुन्हा प्राप्त होते.** त्यामुळे आपण प्रत्येकाने मोठ्या आनंदाने पवित्रतेची राखी बांधली पाहिजे. या राखीचा महिमा पुढील गीताच्या ओळीतून स्पष्ट होतो.

**आत्मा की रक्षा का यही है निराला बन्धन।**
**पवित्रता का है ये अनमोल कंगन।**
**तेरे स्वर्ग के ताज का अधिकार लाई हूँ।**
**राखी के धागो में, शिव का प्यार लाई हूँ।**

तात्पर्य म्हणजे राखी बांधणे हा केवळ दरवर्षीचा सोपस्कार नसून, राखी हे महान परिवर्तन करणारे जादूचे कंगन आहे. पवित्रतेची धारणा केल्यानेच मनुष्य देव–देवतातुल्य बनतो. पवित्रता हीच सर्वश्रेष्ठ धारणा वा धर्म आहे. 'पवित्र बना, योगी बना' हा ईश्वरी संदेश महान आत्मा बनण्याचा आधार आहे.

## रक्षाबंधनाची विधी

राखी बांधताना प्रथम कपाळावर भृकुटीत तिलक लावला जातो. बहीण सुद्धा भावाच्या कपाळी चंदनाचा तिलक अवश्य



**संगमयुगात पवित्रतेचे रक्षासूत्र जे आपल्या हाती बांधतात अर्थात आपल्या जीवनात पवित्रतेची धारणा करतात, तेच सत्ययुगात श्रीकृष्णासमवेत देवी–देवता पदाची प्राप्ती करतात.**

लावते. अशा प्रकारे कपाळावर तिलक लावणे हे **आत्मिक स्मृतीत टिकण्याचे प्रतीक आहे. आत्मिक स्मृती हीच परिवर्तनाचा आधार आहे. मी शरीर नसून आत्मा आहे, ही स्मृती मनुष्याला कवडीपासून हिरेतुल्य बनविते कारण स्वत:ला आत्मा समजल्याने, आत्म्याचा पिता जो परमात्मा, त्याची स्मृती जागृत होते.** तसेच परमात्मा परमपवित्र आहे. त्याला सर्वाधिक प्रिय कुठली वस्तू असेल तर ती आहे पवित्रता. त्यामुळे पवित्रतेची राखी बांधून जे आपल्या जीवनात पवित्रतेची पालना करतात तेच परमात्म्याचे प्रिय बनतात. त्यांनाच पवित्र दुनियेचे अर्थात स्वर्गाचे राज्यभाग्य, परमात्म्या पित्याकडून वारसा रूपाने प्राप्त होते. या अनुषंगाने एक सुंदर काव्य आहे.

**रक्षा करण्या पवित्रतेची,**
**राखी करी बांधिसी।**
**पवित्रतेच्या महामंत्राने,**
**तू देव पदा पोचसी।।**
**सर्व सुखे मिळती तुजला,**
**दृढ निश्चय धरिता।**
**जसा पिता तसे आपण,**
**स्मृती ठेवी तू आता।।**

तात्पर्य म्हणजे जीवनात पवित्रता धारण करण्यासाठी आवश्यक आहे, आत्मिक स्मृतीत स्वत:ला शुद्ध पवित्र आत्मा समजून, पवित्र दृष्टी, वृत्ती व कर्म करण्याचा पुरुषार्थ केल्यानेच आपण भविष्यात देवी-देवता बनतो. म्हणूनच संगमयुगातील पवित्रतेची राखी ही खऱ्या अर्थी नराला श्रीनारायण व नारीला श्रीलक्ष्मी बनविणारी आहे. सदैव लक्षात ठेवा की पवित्रता केवळ सुख, शांतीची जननी नाही तर ती संपूर्ण कल्पाकरिता सद्भाग्य प्राप्त करून देणारी तसेच प्रभुप्रीतीची निशाणी आहे.

### रक्षाबंधनानंतर गोकुळाष्टमी का येते?

रक्षाबंधनानंतर श्रावण वद्य अष्टमीला गोकुळाष्टमीचा सण दरवर्षी साजरा केला जातो. त्याचे आध्यात्मिक रहस्य देखील हेच आहे की संगमयुगात पवित्रतेचे रक्षासूत्र जे आपल्या हाती बांधतात अर्थात आपल्या जीवनात पवित्रतेची धारणा करतात, तेच सत्ययुगात श्रीकृष्णासमवेत देवी–देवता पदाची प्राप्ती करतात. अशी ही पवित्रतेची पालना मनुष्याला देवपदाची प्राप्ती करून देणारी आहे. याविषयी शास्त्रातून अशी एक कथा आहे की इंद्राची पत्नी इंद्राणीने इंद्रास राखी बांधली व इंद्राने आपले गमावलेले स्वर्गाचे राज्य, असुरांचा पाडाव करून पुन्हा प्राप्त केले. याठिकाणी असुर हे आसुरी वृत्तीचे प्रतीक आहे. यावरून आपल्या लक्षात आले असेल की, स्वर्गाचे राज्यभाग्य प्राप्त करून देणारी पवित्रता ही सर्वश्रेष्ठ शक्ती आहे.

### रक्षाबंधनाची प्रथा प्रामुख्याने भारतातच का आहे?

भारत हा असा देश आहे जो सृष्टिचक्राचा आधार आहे. भारतातच स्वर्ग असतो. अर्थात देवीदेवतांचे राज्य भारतातच असते त्यामुळे भारताला देवभूमी वा देवतांची चरित्रभूमी म्हटले जाते. जगातील अन्य कुठल्याही देशात देवीदेवतांचे राज्य नसते. त्यामुळे आपण जर जगाचा इतिहास पाहिला तर भारतातच फक्त देवदेवतांची मंदिरे आहेत. तसेच इतरत्र ज्या देशात भारतीय हिंदू लोकांचे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य आहे; तेथे देखील त्यांनी मंदिरे बांधली आहेत. **त्यामुळे हिंदूचा मूळ धर्म 'आदि सनातन देवीदेवता धर्म' होता, हे सिद्ध होते. परंतु तो धर्म आज प्राय: लोप पावला असल्याचे, त्रिकालदर्शी शिव परमात्म्याने सांगितले आहे व याचेच प्रतीक म्हणून प्रत्येक हिंदूच्या घरात कुलदेवी वा कुलदेवताचे पूजन केले जाते. कुलदेवता हा शब्दच हे स्पष्ट करतो की आपल्या कुळाची देवता अर्थात आपले पूर्वज हे संपूर्ण पवित्र होते** अथवा आपण जेव्हा स्वर्गात होतो तेव्हा आपणही सर्व गुणसंपन्न, १६ कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी (अर्थात पवित्र) होतो. पुढे द्वापारयुगापासून रावण राज्यात आपली उतरती कला होत गेली व आज कलियुगाच्या अंती आपली स्थिती पतित, तमोप्रधान बनली आहे. आपल्याला पुन्हा पावन सतोप्रधान देवीदेवतातुल्य बनविण्यासाठी, पतितपावन शिव परमात्म्याचे दिव्य अवतरण प्रत्येक कल्पाचे अंती भारतातच होते. परमात्मा सर्व आत्म्यांना पवित्रतेचे रक्षासूत्र बांधून 'पवित्र बना, राजयोगी बना' हा महामंत्र देतात. **या महामंत्राची पालना करण्याचा यशाशक्ती प्रयत्न लाखो, करोडो आत्मे करतात. फलस्वरूप या भारतभूमीवर पुन्हा पवित्र दुनियेची अर्थात स्वर्गाची स्थापना होते.** याचेच प्रतीक म्हणून रक्षाबंधनाचा सण प्रामुख्याने भारतात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. त्यामुळे आपण रक्षाबंधनाच्या पावन पर्वावर पवित्रतेची राखी अवश्य बांधूया व पुन्हा स्वर्गात देवीदेवता पद प्राप्त करूया. त्यासाठी सदैव लक्षात ठेवा...

**पवित्रतेचा सूर्य सदाशिव,**
**असे आपुला पिता ।**
**जसा पिता तसेच आपण,**
**स्मृती ठेवी तू आता ।।**

■

(भाग १७)

# वर्णमालेत गवसले जीवनमर्म

- ब्र.कु. डॉ.संजय माळी, पाचोरा.

## पी फॉर प्युरिटी (Purity) अर्थात पवित्रता

पवित्रतेचा पहिला अर्थ म्हणजे स्वच्छता. शरीर हे आत्म्याचे मंदिर आहे. त्यामुळे ते स्वच्छ ठेवणे हे सर्वात महत्वाचे आहे. शरीर, इंद्रिये यासोबतच मन व बुद्धीची स्वच्छता यांनाही मार्क्स आहेत. चारित्र्यसंपन्न व्यक्ती ही पवित्रतेच्याजवळ आहे असे मानले जाते.

मन, वचन व कर्माची शुद्धी हेच ईश्वर प्राप्तीचे सर्वात श्रेष्ठ साधन आहे. सर्व प्रथम मनाचे पावित्र्य म्हणजे काय ते पाहू. विचार करणारी आत्म्याची शक्ती म्हणजे मन होय. सोप्या भाषेत सांगायचे म्हणजे माणूस आहे तिथे मन हे आलेच. मनात दोन्ही प्रकारचे विचार येत असतात. चांगले व वाईट. मनाला चांगला किंवा सकारात्मक विचार करायला शिकवावे लागते. वाईट किंवा नकारात्मक विचार करायला शिकवावे लागत नाही. सकारात्मक किंवा चांगला विचार हाच पवित्र विचार होय. याचा अभ्यास करावा लागतो. राजयोगाच्या अभ्यासाने योग्य-अयोग्य, सार-असार, विवेक-अविवेक याची मनाला योग्य प्रकारे जाणीव होऊ लागते. आपण आपल्या मनात येणाऱ्या विचारांचे निरीक्षण करायला शिकलो की हळूहळू आपले मन हे योग्य विचार करायला प्रशिक्षित होते व त्यामुळे ते पवित्र होत जाते. सतत परमेश्वराचे स्मरण केले तर मन आपोआप लवकर पवित्र होते हे सत्य आहे. मन पवित्र झाले की परमपिता परमात्मा हे आपल्यावर प्रसन्न झालेच म्हणून समजा.

या डोळ्यांनी आपण जे काही बघणार ते पवित्र बघणार. या कानांनी जे काही ऐकणार ते पवित्र ऐकणार. मुखाने जे काही बोलणार ते पवित्र वचनच. आपण जे काम करणार ते पवित्र काम करणार. असे झाले तर पवित्रता आपल्यापासून दूर नाही. परम पवित्र परमात्मा आपले पिता आहेत हे सहज अनुभवाला येते. पवित्रतेचा सागर परमात्मा आपल्याला पवित्र बनवितात. मन, वचन, कर्मानें आपण पवित्र झालो की आपल्याला देवत्व प्राप्त होते. ते अवघड नाही पण त्याचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक असते. सुयोग्य प्रयत्न, जिद्द, चिकाटी, परिश्रम, निष्ठा, सातत्य व अभ्यास या सद्गुणांनी प्राप्त होत नाही अशी एकही गोष्ट या जगात नाही. मन, **वचन, कर्माचे पावित्र्य हेच परमपद आहे. परम सद्गुरु परमपिता परमात्मा हे आपले मार्गदर्शक असल्यावर काळजी करण्याचे काहीच कारण नाही. पवित्र बुद्धीतच ईश्वरी ज्ञानाचा निवास असतो. पवित्र हृदय हेच परम पवित्र तीर्थक्षेत्र होय. पवित्रता प्राप्त करून घेणे व शिव परमात्म्याचे दिव्य प्रेम अनुभवणे हीच सर्वश्रेष्ठ प्राप्ती आहे.**



एअर कंडिशनमध्ये बसले असता जसे समशीतोष्ण वातावरण आपल्याला सुखावह वाटते तसे मन, वचन, कर्माचे पावित्र्य हे तिन्ही काळात आत्म्याला परम सुखावह ठरते. अखंड, अक्षय, अविनाशी परमानंदाची प्राप्ती करून देते. अतींद्रिय सुख देते. आत्मतृप्ती अनुभवते. योगाने बुद्धी स्वच्छ झाली की आपल्याला परमात्म्याची यथार्थ समज येते. त्यातूनच मग समानतेची जाणीव निर्माण होते. एक ईश्वर व आपण सर्व आत्मे त्याची मुले असल्याने, एक परिवार (One God, One World, One Family) ही भावना उत्पन्न झाली की आपल्यातील सर्व प्रकारचे भेदभाव संपतात आणि एकोपा प्रकटतो. जेथे समानता व बंधुभाव एकत्र नांदतात तेथे वैश्विक स्नेह (Universal & Divine Love) उत्पन्न होतो. अंतःकरण पवित्र झाले की तेथे आपोआप दैवी प्रेम प्रवाहीत होते. सर्वांना एकतेच्या सूत्रात गुंफण्याची शक्ती ही फक्त दैवी प्रेमातच असते. (Love is the real power). माणसा-माणसातील मतभेद संपले की स्नेह, सहयोग, सहकार्य, सेवा, समर्पण या आत्मगुणांचा विकास वेगाने होऊ लागतो व येथेच स्वर्ग निर्माण होतो. व्यक्ती-व्यक्तीमध्ये रचनात्मक किंवा विधायक दृष्टिकोन निर्माण झाला की प्रत्येकाला आपापल्या आवडीच्या क्षेत्रात पुढे जाण्याची संधी उपलब्ध होते. रचनात्मकता हाच नवनिर्माणाचा मूलभूत पाया होय. **राजयोगाचा अभ्यास व त्याचा**

**मनाला चांगला किंवा सकारात्मक विचार करायला शिकवावे लागते. वाईट किंवा नकारात्मक विचार करायला शिकवावे लागत नाही. सकारात्मक किंवा चांगला विचार हाच पवित्र विचार होय.**



## ब्रह्मचर्य पालन केल्याने ऋतुंभरा प्रज्ञा जागृत होते व कोणत्याही व्यक्तीचा आध्यात्मिक विकास हा खूप वेगाने होतो

**व्यावहारिक प्रयोग करणे म्हणजे मानव जातीसाठी स्वर्गाचे द्वार उघडणे होय. योग म्हणजे दुसरे काय तर सकारात्मक जीवन शैली होय.** परोपकारादी दैवी गुणांचा विकास होय. मानवातील सुप्त प्रतिभाशक्ती जागविणे होय. या सर्वांचा आधार पवित्रता आहे.

पवित्र विचार माणसाला अंतर्बाह्य पवित्र बनवितात. पवित्र आचार माणसाला देवत्व प्रदान करतात. पवित्र व्यवहार माणसाला स्वर्गाचे राज्य प्रदान करतो. पवित्र सत्कर्म माणसाचे भाग्य बनवितात. पवित्र कर्म केल्याने भाग्यविधाता आपल्यावर प्रसन्न होतो म्हणूनच आपल्यातील प्रत्येकाने पवित्रतेची कास धरायला हवी. पवित्रतेचा एक अर्थ ब्रह्मचर्य पालन असाही आहे. ब्रह्मचर्य पालन केल्याने ऋतुंभरा प्रज्ञा जागृत होते व कोणत्याही व्यक्तीचा आध्यात्मिक विकास हा खूप वेगाने होतो असे प्राचीन ऋषि-मुनींना निश्चितपणे माहीत होते. म्हणूनच अध्यात्म मार्गात वेळोवेळी ब्रह्मचर्य पालन हा विषय समजावून घ्यावा असे शिकविण्यात येते. ब्रह्मचर्य पालन केल्याशिवाय काम-क्रोधादी विकारांना लगाम घालणे अशक्य आहे हे समजून घेतले पाहिजे. जेवढे शक्य तेवढे पाळा ना, काय हरकत आहे. परीक्षेत गुण प्राप्ती ही आपापल्या वैयक्तिक पुरुषार्थावरच असते. हा नियम येथेही लागू पडतो. पण तेवढ्यासाठीच नाराज व्हायचे काहीच कारण नाही. प्रयत्नांती परमेश्वर हेच खरे. **शिवबाबा म्हणतात या जगाला बदलण्याचे सामर्थ्य फक्त पवित्रतेच्या शक्तीतच आहे. जे जे कोणी पवित्रता धारण करतील ते सत्ययुगात हमखास येत असतात.**

पावित्र्य कसे मिळविता येते? आपण आपली स्मृती, दृष्टी, वृत्ती आणि कृती पवित्र बनविली की आपण पवित्र बनतो. जे काही बघणार ते पवित्र नजरेनेच बघू या. शायर म्हणतो, **'नियत अगर अच्छी हैं तो किस्मत तुम्हारी दासी हैं, और नजर अगर अच्छी हैं तो घर में मथुरा काशी हैं।'** दृष्टी तशी सृष्टी. या जगाला आत्मिक, निर्विकारी किंवा पवित्र नजरेने बघितले तर आपली दृष्टी पवित्र म्हटली जाते. दृष्टी पवित्र करायचा सोपा मार्ग म्हणजे मला जे काही दिसते ते; हे सुंदर जग म्हणजे माझ्या पारलौकिक पित्याची अतिशय सुंदर अशी रचना आहे. मनात नेहमी परमपिता असतील तर मन व दृष्टी कधीच विकारी होणार नाही. सृष्टी निर्मात्याला आपण जर विसरलो तर चूक घडू शकते. आत्मा किंवा परमात्मा सदैव स्मृतीमध्ये असेल तर आपली दृष्टी ही लवकर पवित्र होते. पण हा अभ्यासाचा भाग आहे. वृत्ती पवित्र होण्यासाठी आपण नेहमी सर्वांना अंतःकरणापासून शुभभावना द्यावयास हव्यात. कृती पवित्र होण्यासाठी सतत योगयुक्त अवस्था असावी किंवा मनात नित्य परम पवित्र परमेश्वराचेच विचार असावेत किंवा ज्ञानाचे चिंतन, मनन सुरू ठेवावे.

आपल्या मनात नेहमी पवित्र चिंतन असल्यास आपल्या आजूबाजूचे वातावरण देखील पवित्र बनते. आपल्या विचारांचा प्रभाव आपल्या आसपासच्या वातावरणावर निश्चितच पडत असतो. मधुबन येथे पवित्रता का जाणवते? तर तेथील निवासी ब्रह्मावत्स नेहमी केवळ भगवंताच्याच सेवाकार्यात, योगात अथवा ज्ञान चिंतनात असल्यामुळे तेथील वातावरण हे एकदम पवित्र वाटते. सर्व विश्वाला पावन बनविण्यासाठी आपण सर्वांनी आता सतत योगयुक्त असले पाहिजे. आत्म्याला पवित्रतेचा मंत्र देणारे व तंत्र शिकविणारे परमशिक्षक वा परम सद्गुरु स्वतः शिव परमात्मा हेच आहेत **हे सदैव लक्षात ठेवले पाहिजे. 'पवित्र मन रखो, पवित्र तन रखो, पवित्रता मनुष्यता की शान है। जो मन, वचन, कर्म से पवित्र हैं वो चरित्रवान ही यहाँ महान हैं।'**

पवित्रता हा एक अतिशय महत्वाचा सद्गुण आहे. मानवी जीवनात पवित्रता हा सद्गुण आला की त्या पाठोपाठ दुसरेही अनेक सद्गुण जसे शांती, प्रेम, आनंद, संतुष्टता, प्रसन्नता, निरहंकारिता, वगैरे येतात आणि आपले जीवन सद्गुणांनी सुशोभित होते. नव्हे नव्हे पवित्रता ही तर सद्गुणांची खाणच आहे असे म्हणतात. पवित्रता हा स्वर्गाचा राजमार्ग आहे तर अपवित्रता हे नरकाचे द्वार मानले जाते.

मित्रहो, पवित्रता ही महान शक्ती आहे. एक गोष्ट आठवते. पूर्वकाळात एकदा आसुरी शक्तींचा उदय होऊन या भूतलावर फार मोठा हाहाकार माजला होता त्यावेळी उपाय विचारण्यासाठी सर्व सज्जन लोक ब्रह्मदेवांना शरण गेले होते. त्यावेळी थोडा विचार करून ब्रह्मदेव त्यांना म्हणाले होते की तुम्हाला पवित्रतेच्या शक्तीची गरज आहे. पवित्रतेचे आवाहन करा. पवित्र बना व पवित्रता धारण करा. मग आसुरी शक्तींचा समूळ उच्छेद हा झालाच म्हणून समजा. तुम्हा सर्वांचे भले होवो. प्रिय सज्जनहो, ही गोष्ट आजही तंतोतंत लागू पडण्यासारखी आहे.

पवित्रता माणसाला रामराज्य किंवा देवत्व प्रदान करते. याउलट अपवित्रता ही माणसाला रावणाच्या आसुरी संप्रदायात ढकलते. पवित्र बनायचा मार्ग कोणता? पवित्र विचार माणसाला पवित्र बनवितात.



**पवित्र विचार माणसाला पवित्र बनवितात. आदर्श विचार माणसाला आदर्श बनवितात. पवित्र कर्म माणसाला पवित्र बनविते. पवित्र वचनांचे श्रवण केले असता माणूस पवित्र बनतो.**

आदर्श विचार माणसाला आदर्श बनवितात. पवित्र कर्म माणसाला पवित्र बनविते. पवित्र वचनांचे श्रवण केले असता माणूस पवित्र बनतो. खरोखर कोणतेही पवित्र बोल ऐकले असता त्या व्यक्तीच्या मुखाद्वारे जणू काही माता सरस्वतीच बोलत आहे असे वाटते. **पवित्रतेची शक्ती ही सर्वात श्रेष्ठ शक्ती आहे. निर्मळ चारित्र्य हेच पवित्र जीवनाचे परिचायक असते. भूत, वर्तमान आणि भविष्य या तिन्ही काळात पवित्रतेची शक्ती हीच परमोत्तम व सर्व कल्याणकारी मानली जाते.केवळ पवित्रतेच्या शक्तीमुळेच देवी-देवतांची आजही पूजा होत आहे. वंदनीय, पूजनीय बनण्यासाठी पवित्रतेची कास धरली पाहिजे. सर्व प्रकारच्या साधना या हृदय, मन वा अंतःकरण शुद्ध करण्यासाठीच आहेत.** त्याग- वृत्ती, परोपकार, समर्पण व निः स्वार्थ सेवाभाव हे पवित्र  आत्म्याचे लक्षण आहे. दैवी गुणांची धारणा आत्म्याला पवित्र बनविते. शिवबाबांची मुरली रोज श्रवण केली असता आत्मा पवित्र बनतो. पवित्र ग्रंथांचे वाचन किंवा ईश्वरीय महावाक्यांचे वाचन आत्म्याला पवित्र बनविते. मधुबनला भेट दिली असता आत्मा पवित्र होतो. योगी लोकांच्या सहवासात आत्मा पवित्र बनतो. राजयोगाचा अभ्यास केला असता आत्म्याचे मनोमालिन्य व विकर्म नष्ट होतात आणि तो संपूर्ण पवित्र बनतो.

सीतामाई या रावणाच्या कैदेत होत्या तरी केवळ त्यांच्याकडे असणाऱ्या पवित्रतेच्या शक्तीमुळेच त्यांचे त्या नराधमापासून रक्षण झाले. रावण त्यांना कुठलाही शारीरिक त्रास देऊ शकला नाही. पवित्रतेचे व्रत पालन करणारे राम हे मर्यादा पुरुषोत्तम म्हटले जातात तर जबरदस्तीने स्त्रीचे अपहरण करणारा रावण हा राक्षस म्हटला जातो. पवित्रतेने माणूस पूजनीय बनतो व अपवित्रतेने तो धिक्कार करण्या योग्य होतो हेच खरे!

सर्वसाधारणपणे पवित्र मुनष्य हा चारित्र्य संपन्न असतो. त्यामुळे तो एकदम तेजस्वी दिसतो. त्याचे बोलणे सत्याला धरून असते, ओजस्वी असते. त्याच्याकडे देवतांप्रमाणे नैसर्गिक प्रसन्नता असते. एखाद्या लोहचुंबकाप्रमाणे त्याचे व्यक्तिमत्व हे सर्वांना आकर्षित करीत असते. त्याच्या अंतःकरणात सर्वांबद्दल नितांत प्रेम व सद्भावना असते. त्याचे हृदय गंगेप्रमाणे निर्मळ असते. विचार गगनाप्रमाणे विशाल व चिंतन हे सागराप्रमाणे सखोल असते. **गुरुवर्य रवींद्रनाथ टागोर म्हणतात, 'जो जितका प्रेमळ तो तितका अधिक पवित्र होय.' आणि म्हणूनच पवित्र मनुष्य हा ईश्वराच्या अगदी जवळचा मानला जातो, हेही खरच आहे.** आपले हात आणि आपलीच कृती, आपण घडवावी आपली सुंदर मूर्ती! म्हणूनच गायन केले जाते-

**नर ऐसी करनी करे, जो नर से श्री नारायण बने।**
**नारी ऐसी करनी करे, जो नारी से श्री लक्ष्मी बने।।**

■

## सदैव खुश राहण्यासाठी स्वतःला सात सवयी लावा

**१. सदैव खुश राहण्यासाठी केवळ चांगल्या गोष्टींचा शोध घ्या, वाईट नाही.**

**२. खुश राहण्यासाठी दुसऱ्यांना माफ करा. तसेच गरज पडल्यास स्वतःही माफी मागा.**

**३. खुश राहण्यासाठी मनाला आवडेल तेच काम करा अथवा जे काम करत असाल त्यात मन लावा.**

**४. खुश राहण्यासाठी त्या गोष्टींवर विश्वास ठेऊ नका जे केवळ तुमचे अनुमान असेल.**

**५. सदैव खुश राहण्यासाठी आपल्या जीवनाला वा कामाला कोणत्यातरी महान उद्देशासाठी जोडून पाहा.**

**६. खुश राहण्यासाठी आपल्या जीवनात घडणाऱ्या सर्वच गोष्टींना आपण स्वतःच जबाबदार आहोत, असे समजा.**

**७. खुश राहण्यासाठी आपल्या चारही बाजूंना एक मजबूत समर्थन प्रणाली विकसित करा.**



# आरोग्य भावनांचे

- ब्र.कु. गुणवंत पाटील, बिबवेवाडी-पुणे.

हिवाळा भोगी, पावसाळा रोगी व उन्हाळा योगी अशी ग्रामीण भागात म्हण आहे. द्वापर, कलियुगात आत्म्याने रजो, तमो स्थितीत भोगी व रोगी अवस्थांचा अनुभव केल्यानंतर संगमयुगात योगी बनावे, अशी परमपित्याची सद्भावना आहे. **आता तर संगमयुग देखील संपत आले आहे, म्हणून शिवबाबा वारंवार कयामत का समय असा इशारा देत आत्म-परिवर्तनाची दिशा स्पष्ट करीत आहेत. म्हणून समय, श्वास व संकल्प यांकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे कारण संकल्पानेच सृष्टी परिवर्तन शक्य आहे.** अशावेळी प्रत्येक ब्रह्मावत्स हा फरिश्ता (देवदूत) व्हावा ही शिवबाबांची शुभभावना आहे. प्रत्येकास आपल्या चलन व चेहऱ्याद्वारे फरिश्ता स्वरूपाची भासना व्हावी, आपण चालते-बोलते फरिश्ते अर्थात देवदूत नजर यावेत.

योगी हा खळखळत्या पाण्यासारखा असतो. अशा पाण्यात परोपकाराची इतकी श्रेष्ठ भावना असते की, तो त्याच्या प्रवाहवाटेत अडथळे निर्माण करणाऱ्या दगड-धोंड्यांना देखील घासून-पुसून पूजनीय शालीग्राम बनवितो. **म्हणून इतरांबद्दल सद्भावना, शुभभावना व्यक्त करणे, विशिष्ट प्रसंगी शुभेच्छापत्र भेट देणे, हा केवळ एक उपचार होऊ नये, हा विचार-आचार झाला पाहिजे. म्हणूनच प्रत्येकाने दुसऱ्यासाठी जगण्याचा निश्चय केला तर परिवाराचे आणि अंततोगत्वा समाजाचे स्वास्थ्य निरामय होईल.**

झाडे उंच-उंच का होतात कारण त्यांच्यासमोर सतत आकाश असते. पण आम्ही मात्र आकाशाकडे कधी पाहणार? सूर्याला फक्त प्रकाशणे माहीत असते. तो रात्रंदिवस प्रकाश देत राहतो. त्याच्या उबेत समस्त जीवसृष्टी जगते. पण या महान उपकाराची त्याला गंधवार्ताही नसते. मानवाचे मात्र तसे होताना दिसत नाही. तो कणभर करतो आणि मणभर सांगतो. एकदा गांधीजींना विचारले गेले की, तुमचे शत्रू कोण आहेत? गांधीजी धीरगंभीर होऊन उत्तरले, माझा सर्वात मोठा शत्रू हा मोहनदास करमचंद गांधी आहे. मीपणाची भावना ही मानवाची मोठी विकृती आहे. नव्हे नव्हे शत्रूच आहे. या शत्रूने माणसाचा अध:पात घडविला आहे. या शत्रूला आत्म-स्वरूपात राहूनच जिंकता येईल. **जसे आपल्या प्रकृतीचे आरोग्य वैद्यकीय इलाजांनी नीट ठेवता येते, तसेच मी-पणा वा देह-अभिमानाचा आजार आत्मचिंतनाच्या तपस्येनेच दूर करता येईल. तपस्या म्हणजे योग, परमप्रिय पित्याची सहृदय स्मृती. ही प्रभुस्मृती निरंतर रहावी, यासाठी आपले जगणे आनंदयात्रा झाली पाहिजे.** त्यात साधेपणा, आदर्शता, सात्विक भोजन व कर्मात अलौकिकता हवी. ही प्रभुस्मृती अखंड व शक्तिशाली अर्थात ज्वालामुखी हवी.

संगमयुगात जगण्याची वेगळी मजा



**एकदा गांधीजींना विचारले गेले की, तुमचे शत्रू कोण आहेत? गांधीजी धीरगंभीर होऊन उत्तरले, माझा सर्वात मोठा शत्रू हा मोहनदास करमचंद गांधी आहे.**

**व्यसने, चोऱ्या, अत्याचार, भ्रष्टाचार यांचा सुळसुळाट झाला आहे. वाट चुकल्या माणसांना कसा रस्ता दाखववावा ही ज्येष्ठांची समस्या झाली आहे. आज सर्वत्र अंधार वाढतो आहे.**



आहे. आशिक बनून माशूक परमात्म्याला प्रेयस समजून बलिहार जाण्यातच केवढे सुख, परमानंद सामावला आहे. हे सीता बनून अशोक वनात रामाला याद करण्यासारखे आहे. पण आज काय झालं आहे, माणसाने सारे भावविश्व बिघडून टाकले आहे. ईश्वराशी असलेले पवित्र, शुद्ध, विमल संबंध गढूळ करून टाकले आहेत. जीवनबंध स्थितीत मायावश होण्यात सर्व शक्ती खर्ची पडत आहे. जीवनमूल्यांचा येळकोट झाला आहे. व्यसने, चोऱ्या, अत्याचार, भ्रष्टाचार यांचा सुळसुळाट झाला आहे. वाट चुकल्या माणसांना कसा रस्ता दाखववावा ही ज्येष्ठांची समस्या झाली आहे. आज सर्वत्र अंधार वाढतो आहे.

**यावत् जीवेत सुखम् जीवेत, ऋणम् कृत्वा घृतं पिबेत।**
**भस्मिभूतस्य देहस्य, पुनरागमनम् कुतः ।।**

ही चार्वाक वृत्ती वाढते आहे. भोगवादाचे अतिक्रमण ही संस्कृती रक्षकांची चिंता आहे. अशा परिस्थितीत शिव पित्याने स्वपरिवर्तनाचा अभिनव नियम सांगितला. मनुष्य कर्मांनी मोठा होतो तसा कर्मांनीच हीन होतो. आपल्या वाईट कर्मांनीच माणूस दुःखी व अशांत होतो. याउलट चांगल्या कर्मांनीच त्याला सुख व शांती मिळू शकते. संकल्प श्रेष्ठ होण्यासाठी माणसांचे संस्कार, इच्छा विमल हव्यात. म्हणून या गोष्टी दुरुस्त झाल्या पाहिजेत. तरच मनुष्य सुखी होईल. अर्थात सर्व ठीक होण्यासाठी ईश्वरी ज्ञान व राजयोगाद्वारे स्व-परिवर्तन करायला हवे. स्व-परिवर्तनाने विश्व-परिवर्तन हा क्रांतिकारी नियम आहे.

शिवबाबांनी सांगितले आहे की दुसऱ्यांबद्दल शुभभावना, शुभकामना ठेवा. प्रत्यक्षात जेव्हा आपण हे करतो ते दुसऱ्याला तेवढेच भावेल असे होत नाही. तो वेगळ्या रीतीने त्याची परतफेड करतो. तेव्हा आपण विचलित होतो. आपल्या सहनशीलतेचा कस लागतो तेव्हा 'बदला घेऊ नका, स्वतः बदला' असे जे शिवबाबा सांगतात त्याची प्रचिती घ्यायची असते. अशावेळी रेल्वेत भेटणारा भिकारी डोळ्यासमोर आणा. तो तुमच्याकडे भीक मागतो. तुम्ही त्याला पुढे जाण्यास सांगता तेव्हा तो म्हणतो, 'जो देगा उसका भी भला, जो नही देगा उसका भी भला'. कोणी त्याला काठी दाखविली, डोळे वटारले तरी तो हेच म्हणणार, 'देनेवाले का भी भला, न देनेवाले का भी भला'. तेव्हा आपल्या शुभभावनेची, शुभकामनेची जातकुळी ही अशी असावी.भिकारी असूनही श्रीमंत. आपल्याला प्रत्येकाला संतुष्ट करायचे आहे तर आपल्यात नम्रता येईल. जशास तसे ही भावना नुकसान करणारी आहे. 'बेगर टू प्रिन्स' होण्यासाठी त्यागाबरोबर अपमान पचविण्याची शक्ती पाहिजे. **परोपकाराची भावना श्रेष्ठ भावना आहे. ती आपल्या संपन्न बनण्याचा आधार आहे. व्यासांनाही अठरा पुराणांचे सार 'अष्टादश पुराणानाम् व्यासस्य वचनम् द्वयम्। परोपकाराय पुण्याय, पापाय परपीडनम्।' हेच सांगितले आहे.**

परमेश्वर न्यायी आहे. तुमच्या भावनेची शुद्धता तो पाहतो मग ती जोखून घेतो. जेवढी भावना तेवढेच फळ पदरात टाकतो. जीवननिष्ठ असणाऱ्यांच्याच भावना शुद्ध संकल्प करतात. त्यानेच जग समृद्ध केले म्हणून संत तुकोबाही म्हणतात, 'भाव तसे फळ। न चाले देवापाशी बळ।'

माणूस जाणिवेच्या प्रकाशात जगतो. अन्न जसे जगविते तसेच माणसाला जगविण्याचे काम त्याच्या अंतरंगातून उठणाऱ्या सद्भावना, स्फुरणारे विचार व शुभ संकल्प करतात. तेच त्याचे आंतरिक सामर्थ्य वाढवितात. भावनांत ओलावा असावा. अशुद्ध भावना हृदयाला भिडत नाहीत. आपल्या सहृदय भावनाच परिवर्तन करू शकतात. अन्यथा ते अरण्य रुदनच ठरते. **आपल्या भावनांचे आरोग्य समाधानकारक राहण्याने आपल्या भावविश्वात स्थिरता येईल. त्यात मैत्री, दया, करुणा, प्रेम या भावना लक्षणीय आहेत. दुःखी जीवांना करुणा बुद्धीने मदत करणे, सर्वांना चांगले म्हणणे, मन सदैव प्रसन्न ठेवणे, वृत्तीत कटूता न येऊ देणे, अशी मोठी आचार-संहिता मुरलीतून शिवबाबांनी ब्रह्मावत्सांना दिली आहे.**

माणूस सवयीने सदाचारी अथवा दुराचारी होतो. कल्याणकारी सवयीचे संपादन म्हणजे व्रतस्थ वा योगी जीवन. आपले निरामय, संयमित जीवन हा सुंदर सवयींचा, भावनांचा, धारणेचा प्रसाद आहे. सत्यम-शिवम-सुंदरम् हे त्याचे अधिष्ठान असावे. 'Simple Living and High Thinking (साधी रहाणी व उच्च विचारसरणी)' हा आपल्या जीवनाचा मंत्रजागर व्हावा. सेवेत त्यागाची भावना असावी. आज सर्वच क्षेत्रात अनेक प्रकारच्या सेवा चालू आहेत. परंतु या सेवा देणारे Devoted नाहीत Voted आहेत. सेवेत अहंकार नसावा. 'मा फलेषु कदाचन' ही निरागस निरपेक्षता असावी. याठिकाणी आचार्य विनोबांच्या जीवनातील सुंदर प्रसंग



**खरा मित्र कोण हा संभ्रम निर्माण होतो; तेव्हा परमात्म्याशिवाय आपला खरा जीवनसाथी कोण असू शकतो?**

नमूद करावासा वाटतो.

गल्लीतील एखाद्या घरातील स्त्री आजारी असेल तर विनोबांची आई तेथे जायची व त्यांचा स्वयंपाक करून द्यायची. अशावेळी ती प्रथम आपल्या घरात स्वयंपाक करायची आणि मग तेथे जायची. विनोबांनी यावर एकदा आईला म्हटले, 'आई तू मोठी स्वार्थी आहेस. आधी आपल्या मुलांचा, घराचा विचार करतेस आणि नंतर दुसऱ्या घराचा विचार करतेस' आई हसली व म्हणाली, 'शेजारच्यांना गरम जेवण खायला मिळावे, म्हणून मी तेथे वेळेवर जाऊन स्वयंपाक करते आणि येथे तुमच्यासाठी आधी बनवते. मग सांग हा स्वार्थ कसा?' **खरं तर स्वार्थ-परमार्थ या दोन्ही अंतःप्रेरणा आहेत. दुसऱ्याच्या सुखासाठी स्वहिताचा त्याग हा आम्ही आमचा धर्म मानला पाहिजे, त्यावेळी धर्माचरणाचे पुण्य मिळते. धर्माचे नाते सर्वत्र पसरलेल्या सद्‌भावनेशी असते. ही सद्‌भावना निकोप असावी.**

स्वभावातील विभिन्न भावांच्या छटांचा आविष्कार म्हणजे भावना. भावनावशता ही स्वभावाची दुर्बलता वा त्रुटी नव्हे तर शक्ती वा सामर्थ्य आहे. म्हणून भावनांचे आरोग्य अर्थात समतोल राखणेही तेवढेच महत्त्वाचे व आवश्यक ठरते. भावनांचा अतिरेक ही दुर्बलता आहे; तर भावनांचा संयम ही जीवनात सुख-शांती स्थापित करण्याची युक्ती आहे. मनाच्या प्रयोगशाळेत बुद्धीने भावना संयमित ठेवता येतील. भावनांचे नियमन हे दिव्य बुद्धीचे द्योतक आहे. याउलट, भावनांचे प्रदूषण हा खरे तर जगण्यातील मोठा व्यत्यय आहे. ही माणुसकीची व्यथा आहे, खंत आहे. मैत्रीची भावना तशी केवढी पवित्र, निर्मळ व आश्वासक;पण हीच भावना कधी संशयकल्लोळ माजवते. कोण मित्र आणि कोण नाही हेच ओळखणे कठीण होते. खरंतर जीवन दुहेरी झाले आहे तर माणूस दुटप्पी.

जेव्हा या भौतिक जगात तथाकथित मैत्रीचे धागे कच्चे निघतात; खरा मित्र कोण हा संभ्रम निर्माण होतो; तेव्हा परमात्म्याशिवाय आपला खरा जीवनसाथी कोण असू शकतो? मित्र मानताना आपल्याला ही मैत्री निभावता आली पाहिजे. निभावणे याचा अर्थ सोबत चालणे, मतांचा आदर करणे. मगच प्रीतीची रीत निभावली असे म्हणता येईल. मैत्रीत मीपण विसरावे लागते. आत्मअभिमान हा आपला स्वमान आहे, तो राखावा पण अहंकाराचा त्याग ही मैत्री दृढ करतो. कारण त्यामुळे मित्र व मी यातील अंतर कमी होते. मैत्री निखळ निःस्वार्थ होते. मैत्रीत घेणे नसते, असते ते फक्त देणे.

**खुदा-दोस्त हा जगावेगळा न्यारा व प्यारा मित्र आहे. आयुष्याच्या अंतिम क्षणापर्यंत तो आपल्यासोबत असतो. आपली एकरूपता मात्र त्याच्याशी असावी.** गरीब-श्रीमंत, लहान-मोठा, स्त्री-पुरुष, जात-पात, धर्मभेद या पलीकडची त्याची मैत्री असते. आपल्या विश्वासाला, मैत्रीला जागणारा, भावणारा असा हा मित्र आहे. **तो देहधारी नसला तरी आपल्यासोबत सदैव असतो. त्याच्या अनंत प्रेमाची अनुभूती हीच आपली संगमयुगाची सर्वश्रेष्ठ उपलब्धी आहे. आपले अविनाशी प्रारब्ध आहे. परमात्मा आपला खरा साथी आहे. त्याचे प्रेम खरे आहे. म्हणूनच ईश्वरावर खरे प्रेम करा. त्याच्यापासून काहीही लपवू नका.** त्यामुळे गुणवान, योग्य बनण्याची शक्ती, प्रेरणा आपल्याला मिळते. ईश्वराला समर्पित होण्याची इमानदारी दाखविली पाहिजे. आत्मोन्नतीचा याहून श्रेष्ठ मार्ग नाही.

विनम्रता ही आत्म्याची सर्वात मोठी श्रीमंती आहे. ही श्रीमंती आपला ध्यास झाला पाहिजे. अहंकार प्रेमभावना नष्ट करतो. याउलट, नम्रता अहंकारावर विजय मिळवून प्रेम वाढवते. नम्रता म्हणजे लाचारी वा दुर्बलता नव्हे. ती एक शक्ती आहे. 'महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळी वाचती।' ही आहे विनम्रतेची ताकद. सर्वशक्तिवान परमात्मा किती नम्र आहे. सदा ग्लानी होऊनही त्याने नम्र राहून आपला सेवाभाव सोडला नाही. तो म्हणतो, **'मुलांनो, मी तुमचा आज्ञाधारक सेवाधारी (Most Obidient Servant) आहे. 'नम्रता भगवंताच्या समीप जाण्याचा मार्ग आहे. ज्याला वाकणे-झुकणे जमते, समजते, त्याला सर्वार्थी ईश्वर समजला. नम्रतेने झुकणे अर्थात ईश्वराच्या सोबत झुलणे. म्हणून दादी जानकीजी म्हणतात, 'यदि मैं झुकना जानती हूँ तो प्रेम बना रहेगा। यदि झुकना नही जानती तो प्रेम समाप्त हो जायेगा। अतः मुझे बार-बार झुकना है, झुकना है, झुकना है।'**

लाइट-हाऊस, माइट हाऊस स्थितीचा पुरुषार्थ करणाऱ्या श्रेष्ठ आत्म्यांना आता आपल्या शुभ व कल्याणकारी वृत्तीने शक्तिशाली वायुमंडल अथवा वातावरणाचे सृजन करायचे आहे. या वातावरणाच्या शक्तिशाली प्रभावाने दुःखी, अशांत,

▶ पान २७ वर

# सचित्र सेवावृत्त...




कडेगाव (सांगली): आं. योग दिनानिमित्त बँक कर्मचाऱ्यांना 'राजयोग अनुभूती' या विषयावर प्रबोधन करताना ब्र.कु. मीना बहेन.



आमदारी (भोकर): गीता पाठशाळेच्या उद्घाटन प्रसंगी नारळ फोडताना ब्र.कु. दत्तात्रयभाई (शांतिवन) शेजारी ब्र.कु. स्वाती दीदी, ब्र.कु. हर्षिता बहेन व अन्य.



रोहा : 'उत्कृष्ट संघटिका' म्हणून ब्र.कु. मंदा दीदी यांचा सन्मान करताना जेष्ठ समाजसेविका श्रीमती रोहिनी गांगल.



प्रेमगिरी (संगमनेर): येथील गीतापाठशाळेचे उद्घाटन करतांना उपसभापती श्री. तांबे पाटील, अभियंता ब्र.कु. राजनाथ भाई, ब्र. कु. बालूभाई (शांतिवन) व अन्य.



पुणे : 'इंडिया टुडे' ग्रुपचे सल्लागार संपादक श्री. राजदीप सरदेभाई यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र. कु. दीपक भाई.



मिरज (सांगली): आं. योगदिनानिमित्त योगा टिचर डॉ. हर्षल पटवर्धन यांना ईश्वरी भेट देताना ब्र.कु. निवेदिता बहेन.



बार्शी : श्री. १०८ विश्वेश्वर शिवाचार्य दहीवडकर महाराज यांना ईश्वरी संदेश दिल्यानंतर, त्यांच्या समवेत ब्र.कु. संगीता व सुषमा बहेन.



बिचोलीन (गोवा): 'बच्चे मन के सच्चे' या कार्यक्रमात ब्र.कु. शोभा, छाया व हर्षा बहेन.




गडचिरोली : 'वाह जिंदगी वाह' या कार्यक्रमात उपस्थित ब्र.कु. स्वामीनाथन भाई, ब्र.कु. कुसूम बहेन, माजी सांसद डॉ. नामदेवराव उमेंडी, मुख्य कार्यकरी अधिकारी, जि.प. श्री. मेहता, ब्र.कु. नलिनी बहेन व ब्र.कु. दिपकभाई.




डोंबिवली : आ. योग दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाचे उद्‌घाटन करताना ब्र.कु. शकु दीदी, सोबत डॉ. तारा नाईक, प्राचार्य श्री. पाटील, ॲडव्होकेट श्री. संसारे, श्री. मुंकुंद भोइर, मुख्याध्यापिका सौ. रेखा पुणतांबेकर व अन्य मान्यवर.



हिंगोली (बांगूर नगर): डॉ. रोडगे यांना ईश्वरी संदेश देताना ब्र.कु. दत्तात्रयभाई (शांतिवन), शेजारी संचालिका ब्र. कु. अरूणा दीदी.



बांबवडे (कोल्हापूर): युवा पदयात्रेच्या उद्‌घाटनानंतर ग्रुप फोटोत राजयोगिनी सुनंदा बहेन, सरपंच विष्णु यादव, ब्र.कु. सुनिता, शोभा, संगीता बहेन तसेच वसंतभाई.



आंबा (कोल्हापूर): 'तणावमुक्त जीवन' या विषयावर भाषण करताना ब्र.कु. वंदना बहेन, मंचासीन उद्योगपती प्रदीप जाधव, जमीनदार बाळासाहेब गद्रे, ब्र. कु. वर्षा बेहेन व अन्य.



वाशी (नवी मुंबई): विद्यादीप हायस्कूलच्या विद्यार्थ्यांसमोर 'व्यक्तिमत्व विकास' या विषयावर मार्गदर्शन करताना ब्र.कु. शीला दीदी व तन्मयतेने भाषण ऐकताना विद्यार्थी गण.



कांदिवली (प.): व्यसनमुक्ती या विषयावर नाट्य करणारे कलाकार तसेच शताब्दी हॉस्पिटल मधील नर्सेस यांना ईश्वरी ज्ञान दिल्यानंतर त्यांच्या समवेत ग्रुप फोटोत ब्र.कु.वंदना बहेन.




संगमनेर : बाल संस्कार शिबीराचे उद्घाटन केल्यानंतर ग्रुप फोटोत प्राचार्य श्री देशमुख, सोबत ब्र.कु. भारतीबहेन, ब्र.कु. पद्मा बहेन व ब्र.कु. डॉ. योगिनी बहेन.



मेहकर : एस.टी. आगार प्रमुख श्री. पाथरकर व वाहतूक प्रमुख श्री. मोरे यांना शाल व श्रीफळ देऊन, सत्कार करताना ब्र.कु. मीरा बहेन व ब्र.कु. रजनी बहेन.



पाचोरा : शिवदर्शन एक्सप्रेस ट्रेनचे उद्घाटन प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य श्री. मराठे यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. मीरा बहेन.



विटा (सांगली): आं. योग दिनानिमित्त एन.सी.सी. च्या विद्यार्थ्यांना राजयोगाचे महत्त्व समजावून सांगताना ब्र.कु. मीना बहेन.




सातारा (कूपर कॉलनी): शासकीय औ. प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य भ्राता दामोदर यांना ईश्वरी भेटवस्तू देताना ब्र.कु. कांचन बहेन.



देवळा (पेशी): सभापती श्री. शिरसाळ यांना ईश्वरी संदेश दिल्यानंतर भेटवस्तू देताना ब्र.कु अंजु बहेन.




वलसाड : 'वाह जिंदगी वाह' या कार्यक्रमात भाषण करताना जिल्हा पोलीस सुपरिंटेंडेंट, शेजारी ब्र.कु. रंजन भाई व अन्य.



मंचर (पुणे): येथील म. गांधी कॉलेजात 'मुल्यनिष्ठ शिक्षणाची आवश्यकता या विषयावर भाषण करताना ब्र.कु. बालूभाई (शांतिवन)' शेजारी ब्र.कु. संध्या बहेन.




भांडुप : भांडुप पूर्व सेवाकेंद्राच्या उद्घाटन प्रसंगी ब्र.कु. गोदावरी दीदी, ब्र.कु. लाजवंती, ब्र.कु. लतिका, ब्र.कु. काश्मिरा, जे.जे. स्कूल ऑफ आर्टस्चे राजीव मिश्रा, डी.ए.व्ही. कॉलेजचे प्रिंसिपल डॉ. अजय भांबरे, नववर्ष स्वागत समिती अध्यक्ष श्री. भालचंद्र बोपर्डीकर

# श्रीकृष्ण जन्माष्टमी

**- ब्र.कु. गोदावरी, मुलुंड**



प्रत्येक वर्षी श्रीकृष्ण जन्माष्टमीचा उत्सव भारतात सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. भारतवासीयांना श्रीकृष्ण अतिशय प्रिय आहे. त्याची संपूर्ण सतोप्रधान शरीर प्रकृती, हसतमुख प्रसन्न चेहरा तसेच त्याच्या अंतरंगातील सात्विक भाव सर्वांचे मन आकर्षित करणारा आहे. श्रीकृष्ण हा जन्मतःच पूज्य होता. त्यामुळे त्याच्या बाल्यावस्थेच्या चित्रात त्याच्या चेहऱ्याभोवती प्रकाशाचे वलय दर्शविण्यात येते. **श्रीकृष्णाला मनमोहन असेही म्हणतात. कारण त्याचे व्यक्तिमत्त्व सर्वांना आकर्षित करणारे आहे. श्रीकृष्णाचा आत्मा व शरीर दोन्हीही संपूर्ण सतोप्रधान होते. त्यामुळे तो सर्वांगसुंदर होता. त्याच्या सुंदरतेत पवित्रतेची चमक, दिव्यता, सात्विकतेचा प्रभाव, चारित्र्याची श्रेष्ठता व अलौकिकता सामावलेली होती.** त्यामुळे त्याच्यात एक प्रकारचे आकर्षण होते. याच कारणामुळे स्त्रिया श्रीकृष्णाच्या बाल्यावस्थेची आजही फार आठवण करतात आणि ईश्वराकडे हीच प्रार्थना करतात की आम्हाला मुलगा व्हावा तर तो श्रीकृष्णासारखा.



## श्रीकृष्ण सर्वोत्तम देवता, न की परमात्मा

आजही आपण पाहिले तर कित्येक जण श्रीकृष्णाला देवता (अर्थात दैवी गुणवाला मनुष्य) मानतात तर कित्येक जण साक्षात परमेश्वराचा अवतार मानतात. वास्तविक श्रीकृष्णाचे इतके गायन-पूजन होते; यावरून हे स्पष्ट होते की श्रीकृष्ण एक दिव्य विभूती अवश्य होते; परंतु त्यांच्या जन्माविषयीची कथा तसेच त्यांच्या जीवनातील ज्या अनेक लीला चित्रीत करण्यात आल्या आहेत. त्या मात्र विचारशील व्यक्तीच्या बुद्धीला पटत नाहीत, त्याचबरोबर श्रीकृष्णावर अनेक मिथ्या कलंक लावण्यात आले आहेत. उदाहरणार्थ श्रीकृष्णाला १६१०८ राण्या होत्या. तसेच एकाच वेळी श्रीकृष्ण सर्व राण्यांच्या खोलीत उपस्थित होत असे. प्रत्येक राणीपासून त्याला १० पुत्र होते. म्हणजे श्रीकृष्णाला १६१०८० पुत्र होते. जरा विचार केला तर आपल्याला हे पटेल की साकार दुनियेत हे सर्व असंभव आहे. श्रीकृष्ण तर सर्वोच्च देवता होते. त्यांचे गायन 'सर्वगुण संपन्न, १६ कला संपूर्ण, संपूर्ण निर्विकारी, मर्यादा पुरुषोत्तम, परम अहिंसक' असे केले जाते. श्रीकृष्णा मध्ये तर अंशमात्र विकार नव्हते. त्यामुळे श्रीकृष्णाला १६१०८० पुत्र होते. अशा प्रकारचे वर्णन करणे म्हणजे त्यांच्यावर मिथ्या कलंक लावण्यासारखे आहे. असे अनेक कलंक श्रीकृष्णावर लावण्यात आले आहेत.

**तात्पर्य म्हणजे श्रीकृष्ण जन्मापासून महान होते. त्यांची महानता ही होती की ते १६ कला संपूर्ण होते परंतु त्यांना भगवान मानणे, चुकीचे आहे. वास्तविक श्रीकृष्णाच्या पूर्व जन्माला न जाणल्यामुळेच, त्यांना भगवान मानण्याची चूक लोकांनी केली. जर त्यांना हे माहीत असते की सुंदर तन, स्वच्छ मन, अपार धन तसेच वैकुंठीचे राज्यभाग्य हे मनुष्याला त्याच्या गतजन्मीच्या पुरुषार्थाच्या प्रारब्ध रूपाने प्राप्त होते, तर त्यांनी श्रीकृष्णाला भगवान मानण्याची चूक केली नसती.** त्याचबरोबर त्यांना हे देखील ज्ञान नाही की भगवान, कर्म व भोग तसेच जन्म व मृत्यु यापासून सदैव अलिप्त (न्यारा) आहे.

## प्रजापिता ब्रह्मा हेच भविष्यात श्रीकृष्ण बनतात

सत्ययुगी दैवी सृष्टीच्या स्थापनेकरिता, निराकार, शिवपरमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीरात अवतरित होतात व त्यांच्या मुखाद्वारे ईश्वरी ज्ञान व सहज राजयोगाचे शिक्षण देतात. त्याची धारणा करण्याचा नंबर वन पुरुषार्थ प्रजापिता ब्रह्माबाबा हेच करतात. त्याग, तपस्या व सेवा यांच्या जोरावर ते संपूर्ण कर्मातीत, अव्यक्त, फरिश्ता स्थिती प्राप्त करतात. **या त्यांच्या**

---

**वास्तविक श्रीकृष्णाचे इतके गायन-पूजन होते; यावरून हे स्पष्ट होते की श्रीकृष्ण एक दिव्य विभूती अवश्य होते.**

**वास्तविक आपल्या सर्वांची ही शुभेच्छा पूर्ण करण्यासाठीच परमात्मा शिव पित्याचे दिव्य अवतरण भारतभूमीवर झाले आहे.**

**श्रेष्ठतम पुरुषार्थाचे प्रारब्ध रूपाने, भविष्यात तेच श्रीकृष्ण बनतात; असे त्रिकालदर्शी परमात्मा शिवपित्याने सांगितले आहे. (याचेच प्रतीक म्हणून श्रीविष्णुच्या नाभी कमळातून ब्रह्मा उत्पन्न झाले, असे चित्रीत करण्यात येते.**)

श्रीकृष्णाचा आत्मा सत्ययुगात ८ जन्म, त्रेतायुगात १२ जन्म, द्वापरयुगात २१ जन्म आणि कलियुगात ४२ जन्म, असे एकूण ८३ जन्म घेतो. कलियुगाचे अंती (संगमयुगात) निराकर शिव परमात्मा पुन्हा त्यांचया शरीरात अवतरित होतात आणि त्यांचे नाव 'प्रजापिता ब्रह्मा' असे ठेवतात.हाच तो श्रीकृष्णाच्या आत्म्याचा ८४ वा अलौकिक जन्म होय. यावरून आपल्या लक्षात आले असेल की संगमयुगातील प्रजापिता ब्रह्मा हेच सत्ययुगातील प्रथम दैवी राजकुमार श्रीकृष्ण बनतात.

## परमात्मा एक निराकार, ज्योतिस्वरूप आहे

**परमात्मा निराकार, ज्योतिस्वरूप अथवा नूर (प्रकाश) आहे, असे जगातील सर्वच लोक मानतात. त्यालाच विभिन्न धर्मात शिव, ॐकार, अल्लाह, गॉड, जेहोवा इत्यादी नावांनी संबोधतात. परमात्मा सर्व गुणांचा (सुख, शांती, आनंद, प्रेम, पवित्रता, ज्ञान व शक्ती) सागर आहे. तर श्रीकृष्ण सर्वगुणसंपन्न, १६ कला संपूर्ण आहे.** परमात्मा परमधाम निवासी आहे. सूर्य, चंद्र, तारांगण यांच्याही पलीकडे असलेल्या परमधाममध्ये सर्वत्र लाल सोनेरी रंगाचा प्रकाश पसरलेला आहे. (याठिकाणीच आत्मेदेखील मुक्त अवस्थेत असतात) तर भारतात जेव्हा सत्ययुगाची स्थापना होते तेव्हा श्रीकृष्ण जन्माला येतो. त्यामुळेच यमुनेच्या काठी श्रीकृष्णाची सोन्याची द्वारका होती, असे वर्णन आहे.

निराकार परमात्म्याचे दिव्य अवतरण संपूर्ण कल्पात फक्त कलियुगाचे अंती (संगमयुगात) होते तर श्रीकृष्ण सत्ययुगात मातेच्या गर्भातून जन्म घेतो. श्रीकृष्णाला आपले स्वतःचे माता, पिता, बंधू व शिक्षक होते. तसेच श्रीकृष्णाचा आत्मा संपूर्ण कल्पात ८४ जन्माच्या फेऱ्यात येतो. **अशारितीने परमात्म एक निराकार ज्योतिस्वरूप आहे. तोच सर्व आत्म्यांचा पिता आहे. स्वर्गाचा रचयिता आहे. त्याच्यापासूनच स्वर्गाचा वारसा प्राप्त होतो. म्हणूनच त्याला हेवनली गॉड फादर (Hevenly God-Father) असे म्हणतात. यावरून आपल्या लक्षात आले असेल की परमात्मा रचयिता आहे व श्रीकृष्ण त्यांची नंबर वन रचना आहे.**

## श्रीकृष्ण पुन्हा लवकरच भारतात येत आहे

भारतभूमी देवतांची चरित्रभूमी होती. या भारतात ३३ कोटी देवीदेवतांचे वास्तव्य होते, असे गायन केले जाते. सत्ययुगी भारतालाच स्वर्ण, वैकुंठ, बहिस्त, पॅराडाइज, नंदनवन, गार्डन ऑफ अल्लाह रामराज्य, सुखधाम अशी अनेक नावे आहेत. त्यावेळी भारतात एक धर्म, एक राज्य, एक भाष्य, एकता, पवित्रता, सुख, शांती, संपन्नता, आनंद, प्रेम... या सर्व गोष्टी होत्या. अशा या पावन भारत भूमीवर श्रीकृष्णाचा जन्म ५००० वर्षापूर्वी झाला होता व आता पुन्हा लवकरच होणार आहे, असे ज्ञानसागर शिव परमात्म्याने सांगितले आहे. हे सत्य जाणल्यानंतर आपणा सर्वांना अपार आनंद झाल्याशिवाय राहणार नाही. तसेच प्रत्येकाच्या मनात हा शुभसंकल्प



अवश्य उत्पन्न होईल की आपणसुद्धा श्रीकृष्णाच्या समवेत रासलीला करावी, त्याच्या सान्निध्यात रहावे. स्वर्गीय सुखाचा मनसोक्त आनंद घ्यावा. **वास्तविक आपल्या सर्वांची ही शुभेच्छा पूर्ण करण्यासाठीच परमात्मा शिव पित्याचे दिव्य अवतरण भारतभूमीवर झाले आहे. तसेच स्वर्गीय राज्यभाग्य प्राप्त करण्यासाठी, आत्मारूपी सर्व मुलांना हाच संदेश देत आहेत, ''प्रिय वत्सांनो, पवित्र बना व राजयोगी बना. तसेच दिव्य गुणांची धारणा करून मनुष्यापासून देवतातुल्य बना. स्वर्गीय राज्यभाग्याची प्राप्ती हा तुमचा जन्मसिद्ध अधिकार आहे.''**

सारांशाने, श्रीकृष्णासारखे आपणही सत्ययुगी दैवी सृष्टीत राज्यभाग्य प्राप्त करण्यासाठी, श्रेष्ठ पुरुषार्थ करण्याचा दृढ संकल्प करणे, हीच खऱ्या अर्थी जन्माष्टमी साजरी करणे होय. श्रीकृष्णासारखे महान भाग्य प्राप्त करण्याची हीच ती संगमयुगाची परमपावन बेला आहे. आजवर आपण 'जागो मोहन प्यारे, जागो...' असे गीत गात होतो. **आता स्वयं परमात्मा शिव पिता आपल्या लाडक्या मुलांना जागवीत आहे.**

**'जागो, मेरे राजदुलारे जागो, सतयुग आया की आया।'**
**अब अपना श्रेष्ठ भाग्य बनाओ, जैसे ब्रह्माने बनाया।।**

■

# राजयोगाद्वारे स्वस्थ आणि संपन्न समाज

**- ब्र.कु. भगवानभाई, शांतिवन (आबू रोड)**

प्रत्येक वर्षी ब्राह्मण परिवाराच्या उन्नतीसाठी तसेच विश्वभरात ईश्वरी संदेश पोहोचावा म्हणून आपण कोणते ना कोणते लक्ष्य ठेवतो. उदा. युवा वर्ष, सद्भावना वर्ष, शांती वर्ष, परमात्म्य प्रत्यक्षता वर्ष इत्यादी. त्याचप्रमाणे सन २०१५ हे वर्ष 'राजयोगाद्वारे स्वस्थ आणि संपन्न समाज' या रूपाने साजरे करण्याचे ठरविण्यात आले आहे. तसे पाहिले तर 'युनो'द्वारे सुद्धा २१ जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिवस म्हणून जाहीर करण्यात आला. त्याला अनुसरून रविवार दि. २१ जून २०१५ रोजी १९१ देशातून योग सोहळा साजरा करण्यात आला. या १९१ देशांमधील २५१ शहरांमध्ये त्या त्या ठिकाणच्या भारतीय दूतावासातर्फे योग सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. **अशारितीने योगाविषयी विश्वभरात जनजागृतीचे कार्य करण्यात आले. परंतु त्यांच्या योगामध्ये विविध आसने व प्राणायाम यांच्याद्वारे शारीरिक स्वास्थ्य प्राप्त करणे, ऐवढेच मर्यादित उद्दिष्ट आहे. हठयोगात प्राणायाम, अनुलोम, विलोम, कपालभाती इ. शारीरिक क्रियांना महत्त्व आहे. परंतु राजयोगात मात्र शरीराला विसरून अशरीरी, आत्मिक अवस्था प्राप्त करावयाची असते. राजयोगात आत्म्याचा संबंध थेट परमात्म्याशी जोडला जातो.** राजयोगामुळे कामक्रोधादी पाच विकार पूर्णत: नष्ट होतात. अर्थात् आत्मा सतोप्रधान स्थिती प्राप्त करतो. हठयोगात मात्र आत्म्याला संपूर्ण निर्विकारी बनण्याची ताकद नाही. राजयोगाने जन्मजन्मांतरीची विकर्मे व कर्मबंधने नष्ट होतात परंतु हठयोगाने या जन्माचीही विकर्मे नष्ट होत नाहीत. मुख्य म्हणजे राजयोग हा स्वयं परमात्मा शिव पित्याने शिकविला आहे. तर हठयोग हा देहधारी गुरू वा महात्म्यांनी शिकविलेला आहे. तात्पर्य म्हणजे राजयोग व हठयोग ह्यामधील महद अंतर सर्वांना समजावून सांगण्याची आवश्यकता आहे कारण राजयोगाद्वारे स्वस्थ आणि संपन्न समाजाची निर्मिती होऊ शकते.

### वर्तमान समयी योगाचे महत्त्व

वर्तमान समयी आपण बघतो की सर्वत्र दु:ख, अशांती व भीतीचे वातावरण आहे. प्राण्यांपेक्षाही मनुष्याची भीती अधिक वाटते कारण मानव हा दानव बनला आहे. व्यक्तिगत, पारिवारिक, सामाजिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय समस्या दिवसेंदिवस वाढत चालल्या आहेत. मानसिक व शारीरिक आजारही वाढत चालले आहेत. परिणामतः ताण-तणावाचे वातावरण वाढले आहे. मनुष्य निराश, हताश होत चालला आहे. त्याचबरोबर प्रकृती तमोप्रधान बनल्याने अधून-मधून होणाऱ्या प्राकृतिक प्रकोपांना तोंड देताना मनुष्य खचून गेला आहे. अशावेळी राजयोगाच्या अभ्यासाची नितांत गरज आहे.

### समस्यांचे कारण व निवारण

**जीवनातील सर्व समस्यांचे मूळ कारण आहे- देहअभिमान. वर्तमान समयी मानव देहअभिमानामुळेच अनेक समस्यांमध्ये जखडला गेला आहे. याउलट राजयोगी हा आत्मिक स्वरूपामध्ये टिकून राहतो. फलस्वरूप त्याच्या जीवनातील समस्यांचे सहजच समाधान होते.** योगाच्या अभ्यासाने अनेक फायदे होतात. आपली दृष्टी आत्मिक बनते. संबंधात गोडवा निर्माण होतो. मन शांत झाल्याने, विचार धैर्यवत तसेच सकारात्मक चालतात. त्यामुळे मानसिक व शारीरिक रोगांपासून आपण खूप दूर राहतो इतकेच नव्हे तर योगामुळे आत्मविश्वास वाढतो. परिणामत: जीवनात निश्चिंतता येते व आपण तणावापासून दूर राहतो. योगाद्वारे अतींद्रिय सुखाची प्राप्ती होते. त्याच्या तुलनेने भौतिक. सांसारिक अथवा विकारांचे क्षणिक सुख हे एकदम तुच्छ वाटू लागते. त्यामुळे आपण विकारांपासून सहजच मुक्त बनू शकतो.

### राजयोग हाच विश्व परिवर्तनाचा आधार

राजयोगाचा अभ्यास करताना मनामध्ये सतत सकारात्मक संकल्प चालतात. त्याचा परिणाम भोवतालच्या वातावरणावर



**मनुष्य निराश, हताश होत चालला आहे. त्याचबरोबर प्रकृती तमोप्रधान बनल्याने अधून-मधून होणाऱ्या प्राकृतिक प्रकोपांना तोंड देताना मनुष्य खचून गेला आहे.**



**आपसात स्नेह, सहयोग, सद्भावना, समभाव, दया, क्षमा, शांती... या सद्गुणांची उत्पत्ती होते. म्हणून वर्तमान परिस्थितीला बदलण्यासाठी राजयोगाची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण आहे.**

देखील होतो. ते शुद्ध, शक्तिशाली बनते. त्यामुळे प्राकृतिक आपत्तीपासून आपला बचाव होतो. इतकंच नव्हे तर प्राणीमात्रावरही त्याचा परिणाम होतो. प्राणीसुद्धा अहिंसक बनतात. मुख्य म्हणजे मानवामध्ये आत्मिक जागृती झाल्याने, धर्मभेद, जातीभेद, रंगभेद, भाषाभेद, राष्ट्रभेद... हे सर्व भेदाभेद नाहीसे होऊन विश्वबंधुत्वभाव जागृत होतो... त्यामुळे आपसात स्नेह, सहयोग, सद्भावना, समभाव, दया, क्षमा, शांती... या सद्गुणांची उत्पत्ती होते. म्हणून वर्तमान परिस्थितीला बदलण्यासाठी राजयोगाची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

**परमात्मा शिव पित्याशी योगमुक्त झाल्यानेच, मानवी मनामध्ये बदल घडून येईल आणि हा समाज स्वस्थ व संपन्न बनू शकेल. मानव हाच या सृष्टीचा केंद्रबिंदू आहे. जर मानव बदलला तर आपोआपच विश्वातील सर्व समस्यांचे समाधान होईल.** राजयोगाच्या अभ्यासानेच मानव देवतातुल्य बनतो व ही नर्कतुल्य सृष्टी पुन्हा स्वर्ग बनते. यावरून आपल्या हे लक्षात आले असेल की राजयोग हाच विश्व परिवर्तनाचा आधार आहे. या अनुषंगाने पुढील काव्य पंक्ती अतिशय उद्बोधक आहेत--

**राजयोग के ही बलसे हमे, तत्त्वों**
**को पावन बनाना है।**
**ये धरती और आसमाँ दोनो को**
**स्वर्णिय हमे बनाना है।**
**राजयोगी बनकर जहाँ का हर**
**अंधियारा मिटाते चलो।**
**सबके भाग्य जगाते चलो.....।**

■

---

# सेवेत वृद्धी करण्याची विधी सदैव विशेषता पाहण्याचा चष्मा लावा

सेवेत वृद्धी करण्याचे मुख्य साधन आहे- सदैव दुसऱ्याची विशेषता वर्णन करणे. याच विधीने आजपर्यंत सेवेत वृद्धी होत गेली व पुढेही होत राहील. संघटनरूपी माळेचा धागा आहे- सदैव दुसऱ्यांची विशेषता पाहायला शिकणे, एक-दुसऱ्याला पुढे करणे, आपसात स्नेह व एकता कायम टिकवणे. तात्पर्य म्हणजे संघटनाचा विशेष धागा आहे- एक दुसऱ्याची विशेषता सोडून, दुसरे कोणतेही वर्णन न करणे. त्यामुळे सदैव विशेषता पाहण्याचा चष्मा लावा.



कधी एखादी गोष्ट निदर्शनास आली तरी तिचे वर्णन कधीच करू नका. **कारण कमी वर्णन करणे म्हणजे भाग्य गमावणे. शिवबाबांनी ज्यांना निमित्त बनवले आहे, त्यांची कमी वर्णन करणे म्हणजे शिवबाबांची कमी वर्णन करण्यासारखे आहे. त्यामुळे निमित्त बनलेल्यांविषयी शुभ भावनेशिवाय, अन्य काहीही वर्णन करणे, अनुचित आहे.**

शिवबाबा कधीच कुणाची कमजोरी पाहत नाहीत. कुणाला इशारा जरी दिला तरी विशेषतापूर्वक, सन्मानपूर्वक इशारा देतात. वास्तविक शिवबाबा तर ऑथोरिटी आहेत तरी देखील मुलांना सदैव आधी सन्मान देऊन मग इशारा देतात. हीच शिवबाबांची विशेषता प्रत्येक मुलांमध्ये जागृत असली पाहिजे. यालाच म्हणतात 'फॉलो फादर'. ■

# खरा कुंभमेळा

- ब्र.कु. दिलीप राजकुळे, (शांतिवन)



भारतात प्राचीन काळापासून सिंहस्थ पर्वणीत दर बारा वर्षांनी अलाहाबाद, हरिद्वार, उज्जैन, नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळा भरतो. यावर्षी देखील गोदातीरी होणाऱ्या एकविसाव्या शतकातल्या दुसऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याला दि. १४ जुलै २०१५ रोजी सुरुवात झाली आहे. सदरच्या कुंभमेळ्यात सुमारे एक कोटी भाविक येण्याचा अंदाज आहे. तसेच या कुंभमेळ्यावर तब्बल अडीच हजार कोटी रुपयांचे द्रव्य महाराष्ट्र शासन व नाशिक महानगरपालिकेने खर्च केले आहे. अवघ्या दीड वर्षात एखाद्या धार्मिक उत्सवासाठी इतका प्रचंड निधी खर्च होण्याचे हे एकमेव उदाहरण आहे.

सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे विशिष्ट पर्वकाळात स्नान केल्याने पापे धुवून निघतात असे म्हटले जाते; परंतु त्यासाठी होणारी घाई, गडबड व मानपानावरून महंतांमध्ये होणारे वाद अनाकलनीय आहेत, मागील सिंहस्थाच्या शाही मिरवणुकीच्या वेळी चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेत ३३ भाविकांना प्राण गमवावे लागले होते. भाविकांची गर्दी विभागली जावी म्हणून विष्णु पंथीयांनी नाशिक येथे तर शैव पंथीयांनी त्र्यंबकेश्वर येथे स्नान करावे, अशी प्रथा आहे; परंतु यंदाच्या कुंभात नाशिक व त्र्यंबकेश्वरच्या शाही स्नानाच्या दोन तिथी एकाच दिवशी येत असल्याने, उपरोक्त दिवशी लाखो भाविक दोन्ही ठिकाणी स्नानाचा योग साधण्याचा प्रयत्न करतील. त्यामुळे त्या दिवशी ये-जा करणाऱ्या जन सागराचे व्यवस्थापन, हे प्रशासनासमोर मोठे आव्हान ठरेल.

**खरं तर कुंभमेळ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी शासनातर्फे जो अमाप पैसा, समय व शक्ती खर्च केले जाते, त्यातील १ टक्का जरी शासनाने लोकांना सत्य ईश्वरी ज्ञान देण्यासाठी वापरली तरी लोकांचे कल्याण होईल. कुंभमेळ्यात लाखो भाविक पर्वकाळात मोठ्या भक्तिभावाने पाप क्षालनासाठी नदीच्या पाण्यात स्नान करतात परंतु त्यांना हे माहीत नाही की त्यामुळे फक्त शरीराचे शुद्धीकरण होते. आत्म्याच्या शुद्धीकरणासाठी ज्ञानस्नानाची नितांत आवश्यकता आहे. म्हणूनच गीतेतही म्हटले आहे 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते। (४-३८) (अर्थ : या जगात ज्ञानाइतकी पवित्र गोष्ट दुसरी कोणतीही नाही.)**

## कुंभमेळ्याचे रहस्य

वर्तमान संगमयुगात (कलियुगात अंत व सत्ययुगाचा प्रारंभ यांचा संधीकाळ) ज्ञानसागर परमात्मा, पतित आत्म्यांना पुन्हा पावन बनविण्यासाठी ज्ञानामृताचा कलश प्रदान करीत आहेत. निराकार शिव परमात्मा, प्रजापिता ब्रह्मा यांच्या शरीराचा आधार घेऊन, सत्य गीता ज्ञान व राजयोगाचे शिक्षण देत आहेत, हे ईश्वरी ज्ञान हेच खऱ्या अर्थी अमृत आहे. हे ज्ञान आपल्या बुद्धीरूपी कलशात धारण केल्यानेच पवित्र मनुष्यात्मा पावन बनतो. त्याला अमर देवपदाची प्राप्ती होते. **दोन कल्याच्या संगमावर निराकार परमात्म्याने, ब्रह्मामुखकमळाद्वारे दिलेले ईश्वरी ज्ञान ज्या माता-भगिनी ग्रहण करतात, त्यांच्या अलौकिक दिव्य जन्मामुळे त्यांना 'ब्रह्माकुमारी' असे म्हटले जाते. याच खऱ्या अर्थी ज्ञानसागर परमात्म्यापासून निघालेल्या ज्ञान-गंगा, ज्ञान-यमुना, ज्ञान-सरस्वती, ज्ञान-गोदावरी आदी नद्या आहेत.** या ब्रह्माकुमारी बहिणी विश्व भरात ईश्वरी ज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी निमित्त बनतात. तसेच मनुष्य आत्म्यांचे परमात्म्याशी मीलन अर्थात संगम घडवितात याचेच शास्त्रातून गायन केले जाते.

**आत्माएँ, परमात्मा अलग रहे बहुकाल,**
**सुंदर मेला कर दिया, जब सद्गुरु मिला दलाल।**

अशा प्रकारे आत्म्यांचे परमात्म्याशी मीलन होणे, हाच खरा कुंभमेळा आहे. हा परमात्म मेळा सर्व प्राप्ती करविणारा आहे तसेच परमात्म्याशी सर्व संबंधांचा अनुभव करविणारा आहे. आपले सर्व खजाने संपन्न करणारा हा मेळा दिलाराम शिवबाबा व त्याच्या प्रिय आत्मारुपी मुलांचा आहे. त्यामुळे संगमयुगात सदैव परमात्मा मीलन मेळ्याचा परमानंद लुटत राहा- याचेच गायन आहे.

**मन राम (दिलाराम शिवबाबा) रंगी रंगले।**
**आत्मरंगी रंगले मन, विश्वरंगी रंगले...**

■

(भाग १) (खास ब्रह्मवत्सांसाठी)

# संगमयुगी ब्राह्मण जीवनाची अंतिम स्थिती-कर्मातीत

- ब्र.कु. जगदीश दीक्षित, पुणे

संगमयुगी अलौकिक ब्राह्मण जीवनाचे अंतिम लक्ष्य आहे श्रेष्ठ कर्मांच्या आधारे सत्ययुग त्रेतायुगातील वीस जन्मांच्या दैवी प्रारब्धाचे बीज पेरून ब्रह्माबापसमान कर्मातीत स्थिती प्राप्त करणे. जीवनमुक्त स्थिती व कर्मातीत स्थिती ही एकाच पुरुषार्थरूपी रथाची एकाच वेळी चलायमान होणारी दोन चाके आहेत. कारण ह्या दोन्हीही स्थिती आत्म्याला बंधनमुक्त करणाऱ्या आहेत. अशी ही आत्म्याची अद्वितीय व अनमोल स्थिती बनविणारा, सदैव कर्मातीत स्थितीत स्थित असलेला व कर्मातीत स्थिती कशी प्राप्त करावयाची ह्याचे परिपूर्ण ज्ञान असलेला निराकार परमात्मा जोपर्यंत अवतरित होत नाही तोपर्यंत मनुष्य आत्म्यांसाठी असलेली ही सर्वोच्च स्थिती कोणीही प्राप्त करू शकत नाही. हे निश्चित आहे की, परमधाममध्ये प्रत्येक आत्म्याची स्थिती ही कर्मातीतच असते. परंतु ती काही पुरुषार्थाने प्राप्त केलेली स्थिती नव्हे. कर्म करीत असतानाच कर्मातीत स्थिती प्राप्त करणे हा खरा पुरुषार्थ आहे. कर्मातीत स्थितीविषयी कुणालाच ज्ञान नसल्याने भक्तिमार्गातील कोणत्याही शास्त्रात 'कर्मातीत' हा शब्दच नाही. फलस्वरूप केवळ परमात्माच मनुष्य आत्म्यांना कर्मातीत स्थिती प्राप्त करण्याचे अंतिम लक्ष्य देऊ शकतो. हे लक्ष्य प्राप्त करण्यासाठी प्रथमतः आवश्यक आहे बेहदची वैराग्य वृत्ती. परमात्म ज्ञानप्राप्तीनंतर साधकाला असे बेहदचे वैराग्य आले तरच तो बेहदचा त्यागी बनून आपले अंतिम लक्ष्य प्राप्त करू शकतो. **बेहदचे वैराग्य हे भविष्यात फलिभूत होणाऱ्या कर्मातीत स्थितीच्या वृक्षाचे बीज आहे. हे बीजच पेरले गेले नाही तर कर्मातीत स्थितीसाठी साधकाने केलेला पुरुषार्थ निष्फळ होऊ शकतो. बेहदचा वैरागीच बेहदचा त्यागी बनून आपले सर्वस्व परमात्म्याला समर्पण करतो. समर्पणमय स्थिती ही कर्मातीत स्थितीच्या वृक्षाची मुळे आहेत; तर श्रेष्ठ संकल्प, श्रेष्ठ योगयुक्त स्थिती व श्रेष्ठ कर्म हे ह्या वृक्षाचे खतपाणी आहे. ह्या वृक्षाची मुळे पक्की होण्यासाठी साधकाला तन, मन, धन तसेच लौकिक परिवार अर्थात देहाच्या संबंधियांनाही मन-बुद्धीने परमात्म्याच्या सन्मुख समर्पित करून ट्रस्टी बनावयाचे आहे.** इतकेच नव्हे तर मनातील प्रत्येक संकल्पही त्याला समर्पित करावयाचा आहे. साधक असा संपूर्ण समर्पित झाला की, कर्मातीत स्थितीच्या वृक्षाचा पाया पक्का झाला आहे असे समजावे.



हा पाया पक्का झाल्यानंतर साधकाने प्रथमतः देहातीत होऊन आत्मिक स्वरूपात स्थित होणे आवश्यक आहे. साधकाला कर्म करीत असतानाच कर्मातीत स्थिती प्राप्त करावयाची आहे. परंतु केलेल्या कर्माचा व कर्मफळाचा कोणताही परिणाम अथवा प्रभाव त्याच्यावर होता कामा नये, अर्थात लाभ-हानी, निंदा-स्तुति, मान-अपमान व सुखदुःखांच्या प्रभावातूनही मुक्त स्थिती! असे प्रभावमुक्त होण्यासाठी ड्राम्याचे यथार्थ ज्ञान व साक्षी 'द्रष्टा' होणे आवश्यक आहे. परिवारात, समाजात व वैश्विक स्तरावर अनेक चांगल्या वाईट घटना घडत असताना साक्षी द्रष्टा होऊन त्याकडे पाहणारा आत्माच आपले अंतिम लक्ष्य प्राप्त करू शकतो. साक्षीभाव नसेल तर मनात सकारात्मक व नकारात्मक संकल्पांची खळबळ माजते. सदा साक्षीभाव ठेवल्याने कमीतकमी कल्याणकारी व शक्तिशाली संकल्प साधकाच्या मनात निर्माण होतात. एखाद्या क्रिडा प्रकारात कोणी जिंको अथवा हारो तो त्याकडे साक्षीभावाने पहात असतो. त्याला परमात्म ज्ञानाच्या आधारे हे पक्के ज्ञात असते की, संपूर्ण चारित्र्य संपन्न, संपूर्ण पवित्र व सर्वोच्च आत्मिक स्थितीचा वर्ल्ड कप आपणच जिंकणार आहोत. ह्या महान विजयाचे श्रेय मात्र तो ह्या अनादि व अलौकिक खेळाचा सर्वोच्च प्रशिक्षक (कोच) परमात्म्यालाच देईल.

कर्मांच्या ह्या खेळात विजयाची वाटचाल करणारा साधक स्वतःला निमित्त समजून प्रत्येक कर्म करित असतो. कर्ता—करविता

**साधकाला कर्म करीत असतानाच कर्मातीत स्थिती प्राप्त करावयाची आहे. परंतु केलेल्या कर्माचा व कर्मफळाचा कोणताही परिणाम अथवा प्रभाव त्याच्यावर होता कामा नये.**

## पिताश्रींच्यासमान कर्मातीत स्थिती प्राप्त करावयाची असेल तर आपणही आपल्या कर्मभोगाला आनंदाने पार करावयास हवे



परमात्मा मज आत्म्याकडून कर्म करवून घेत आहे ह्याची त्याला कदापि विस्मृती होत नाही. कर्मात अंशमात्रही अहम्भाव असेल तर सूक्ष्म अहंकारही निर्माण होऊ शकतो. असा अहंकार निर्माण होऊ नये म्हणून महारथी साधकाची हीच संकल्पना असते की, शरीर एक रथ आहे. ह्या रथात मी आत्मा रथी आहे, पाच कर्मेंद्रिये पाच अश्व आहेत. सर्व शक्तिवान परमात्म्यालाच ह्या शरीर रथाचे सारथ्य करावयाचे असल्याने मनबुद्धीचा लगाम त्याचे हाती सोपवून मी रथी निश्चित झालो आहे. अर्थात त्याच्या श्रीमतानुसारच हा शरीर रथ चालणार आहे. अशा प्रकारे शरीर, शरीराद्वारे होणारी कर्मे व मनातील संकल्पही परमात्म्याला समर्पण करणे म्हणजे भगवद्गीतेचा नं १ अर्जुन होणे होय! हेच कर्मातीत स्थिती बनविण्यासाठी केलेले शुभारंभाचे शुभसंकल्प आहेत. गीतेत म्हटले आहे 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन' अर्थात कर्मावर तुझा अधिकार आहे कर्मफळावर नाही. येथे तर साधकाने समस्त कर्मेही परमात्म्याला समर्पण केली असल्याने गीतेच्या ह्या वास्तविक अर्जुनाला कर्मफळाची अपेक्षा अंशमात्रही राहात नाही. बेहदच्या वैराग्यानंतर मनात सर्वस्व समर्पणाचा भाव निर्माण होवून त्याप्रमाणे समर्पित होणे ही कर्मातील बनण्याची प्रथम पायरी आहे. ह्या प्रथम पायरीनंतर कर्मातीत स्थिती बनविण्यासाठी अनेक पायऱ्या पादाक्रांत करताना बराच काळ नियमित अभ्यास करून साधक ज्यावेळी परिपूर्ण अवस्थेला पोहोचेल त्यावेळी तो ह्या भौतिक शरीराचा कायमस्वरूपी त्याग करून विश्वकल्याणार्थ आपल्या सूक्ष्म शरीराद्वारे विहंगमार्गाची सेवा करण्यासाठी तत्पर होईल; जी सेवा आजही अव्यक्त ब्रह्माबाबा करीत आहेत. साधकाचा हा निश्चय असतो की, जर मजला बापसमान बनावयाचे असेल तर पिताश्रीनी आपल्या संगमयुगी जीवनात अनेक प्रकारच्या धारणा करून सर्व प्रकारच्या परिस्थिती सहज पार केल्या. अर्थात मज आत्म्यालाही सर्व प्रकारच्या धारणा करून परिस्थितींचा सामना करीत असतानाच कर्मातीत स्थिती प्राप्त करावयाची आहे. त्यासाठी एक बल एक भरोसा ठेवणे आवश्यक आहे. साधकाला कर्मातीत स्थितीविषयी हे अत्यंत महत्त्वपूर्ण ज्ञान प्राप्त होते की, एकदा कर्मातीत स्थिती प्राप्त झाली की, त्या स्थितीपासून आत्म्याचे अंशमात्रही पतन होत नाही. कारण आत्मा मायेच्या भौतिक शरीरात नसतो. जेथे पाच तत्त्वांचे शरीर आहे तेथे पाच विकार आत्म्यावर आक्रमण करू शकतात. परंतु सतोप्रधान विश्वकल्याणी फरिश्ता रूपावर मायेचा अंशमात्रही परिणाम होत नाही. म्हणून स्थापनेच्या कार्यात परमात्म्याला अशा सतोप्रधान व मायामुक्त फरिश्त्यांची आवश्यकता असते. फरिश्ता स्थितीद्वारेच आत्मा स्थापनेच्या कार्यात, परमात्म्याला अधिकाअधिक सहयोग देऊ शकतो. भाग्यविधात्यालाच सहयोग देणे म्हणजे आपल्या दैवी भाग्याचा उदय करणे होय!

**कर्मातीत स्थिती प्राप्त करण्यासाठी परमात्म्याने साधकांना ज्या धारणा सांगितल्या आहेत त्यामध्ये मुख्य धारणा आहे हदमधून बेहदमध्ये जाणे, संकुचित दृष्टिकोनातून विशाल दृष्टिकोनात जाणे. बेहदमध्ये जाण्यासाठी मुख्य बाधा आहे हदच्या स्वभाव संस्कारांची. हदच्या स्वभाव संस्कारापासून मुक्त व्हायचे असेल तर साधकाने आपला देह बेहदच्या कार्यासाठी परमात्म्याला समर्पण करावा.** ज्याप्रमाणे परमात्मा आपले कार्य करण्यासाठी अवतरित होतो तद्वतच मी आत्मा ह्या देहात अवतरित होवून बेहदचे कार्य करीत आहे; असा संकल्प साधकाने करून, अवतरित आत्म्याची स्थिती निरंतर अबाधित ठेवावी. ही स्थितीच त्याला हदमधून बेहदमध्ये घेऊन जाईल. परगांवी असलेल्या नातेवाईकाकडे जाऊन आपण चार दिवस त्याच्या घरात राहतो; परंतु आपल्याला हे पक्के माहीत असते की, हे घर काही माझे नाही. अशाच प्रकारे साधकाने हा निश्चय करावा की, हे शरीररूपी घर आता माझे राहिलेले नाही हे तर मी कधीच शिवबाबांना समर्पण केले आहे. मी आत्मा ह्या विश्वातच नव्हे तर ह्या शरीरातही पाहुणा आहे. अर्थात मज आत्म्याचे वास्तविक घर परमधाम आहे जे घर वाणीतून मुक्त आहे. पिताश्री ज्यावेळी कर्मातीत स्थितीच्या समीप आले होते त्यावेळी ते आवश्यक तितकेच बोलत. ते बोलत असताना अन्य ब्रह्मावत्सांना हा अनुभव येत असे की, बाबा कोणत्या तरी गहन संकल्पात व श्रेष्ठ स्मृतीत हरवले आहेत अर्थात ह्या साकार दुनियेत असतानाही त्यांचे अस्तित्व मनबुद्धीने निराकारी दुनियेतच होते. देहात विदेही व व्यक्तमध्ये अव्यक्त अशी त्यांची स्थिती होती. साकार देहाद्वारे कर्म करीत असतानाही अन्य आत्म्यांना फरिश्ता रूपाचा अनुभव करविणे हा देखील महान पुरुषार्थ आहे जो पुरुषार्थ पिताश्रींनी सहज करून दाखविला. आजही पिताश्री आपल्या अव्यक्त रूपात भेटत असल्याचा अनुभव क्रित्येक ब्रह्मावत्सांना येत आहे.

कर्मातीत स्थिती प्राप्त करीत असताना कोणतीही बाधा निर्माण होऊ नये म्हणून साधकाने ह्या व्यवहारी जगात जागृत राहिले पाहिजे. त्याने असा कोणताच व्यवहार करू



**अंतिम समयी अनेक समस्या उग्ररूप धारण करतील परंतु आपल्या संपन्न व महान स्थिती द्वारे साधक प्रत्येक समस्येला लहान बनवेल.**

नये ज्यामुळे ईश्वरीय अथवा ब्राह्मण कुळाच्या मर्यादांचा भंग होऊन अन्य आत्म्यांशी कर्मबंधन निर्माण होईल. म्हणून प्रत्येक कर्मासाठी श्रीमत काय आहे; हे कर्म करताना साधकाच्या बुद्धित येणे आवश्यक आहे. **संगमयुग आहेच कर्मबंधनमुक्त होऊन जीवनमुक्त व कर्मातीत होण्याचे युग! अशा ह्या सर्वश्रेष्ठ युगात साधकाचे प्रत्येक कर्म श्रेष्ठ होणे आवश्यक आहे त्यासाठी हा नशा सतत असावयास हवा की, ह्या संगमयुगावर माझा पार्ट सर्वशक्तिवान परमात्म्यासमवेत आहे. जो साधक हा नशा अबाधित ठेवेल त्याचे कर्म निश्चितपणे श्रेष्ठ होईल.** पुरुषोत्तम संगमयुगावरील वर्तमान समयीचा ब्राह्मणजन्म हा अन्य आत्म्यांना दिव्यतेची अनुभूति करवून देणारा हिरेतुल्य जन्म आहे. देवतांच्यापेक्षाही श्रेष्ठ असलेल्या ह्या हिरेतुल्य जीवनाची प्रत्यक्षता झाली की, साधकाच्या मनात अंतिम संकल्प हाच येईल की, आता मला माझ्या पारलौकिक पित्यासमवेत निजधामी जायचे आहे. बंधूनो, दीर्घकाळापासून निजधामी जाण्याची आंतरात्म्यात निर्माण झालेली ओढच आत्म्याला कर्मातीत स्थितीपर्यंत नेऊन ठेवते. जो आत्मा परमधाममधील आपल्या अनादि स्वरूपाला व साकार सृष्टीवरील दैवी आदि स्वरूपाला ज्ञानाच्या व योगाच्या आधारे जाणतो ज्याला आपल्या सतोप्रधान स्वरूपाची स्मृती प्राप्त होते तोच आत्मा संपूर्ण निर्विकारी व निराकारी बनण्याचा पुरुषार्थ करून सहज फरिश्ता बनू शकतो अर्थात सहज फरिश्ता बनणारा आत्मा सहज कर्मातीतही बनू शकतो. फरिश्ता रूपधारी आत्म्याला ना पाच तत्त्वांचे ना पाच तत्त्वांच्या देहाचे अंशमात्रही बंधन अथवा आकर्षण रहात नाही.

सर्वसामान्य मनुष्यआत्मा शारीरिक कर्मभोग भोगत असताना अत्यंत दुःखी होतो; परंतु राजयोगी आत्म्याला मात्र आपल्या कर्मभोगाची तितकीशी जाणीव होत नाही; कारण त्याला अशरीरी बनण्याची प्रॅक्टीस झालेली असते. कर्म करतानाही त्याला कधी परमात्म्याची विस्मृती होत नाही. **कर्मयोगच कर्मभोगाला हलका बनवितो. पिताश्रींच्या अंतसमयी कर्मभोगाने त्यांची फार मोठी परीक्षा घेतली. परंतु ह्या महारथी आत्म्याने कर्मभोगावर कर्मयोगाने कसा विजय प्राप्त करावा ह्याचा महान आदर्श ब्रह्मावत्सांच्या पुढे ठेवला. पिताश्रींच्यासमान कर्मातीत स्थिती प्राप्त करावयाची असेल तर आपणही आपल्या कर्मभोगाला आनंदाने पार करावयास हवे त्याच बरोबर पिताश्रींच्या समान कर्मयोगी होऊन प्रत्येक कर्म बिनचूक करावयास हवे.** बंधूनो, छोट्या छोट्या चुकांचाही फार मोठा हिशोब बनू शकतो. म्हणून कर्म करताना साधकाला नारायणी नशा व ईश्वरीय नशा असणे आवश्यक आहे, अन्य नशेत कर्म करताना हमखास चुका होतात परंतु ह्या नशेत कर्म बिनचूक होते. परिपूर्ण कर्मातीत स्थिती प्राप्त होईपर्यंत हा नशा चढतच राहिला पाहिजे. नशा उतरला तर निशानाही दूरवर दृष्टिपथात येईल. कर्मातीत स्थिती समीप आली असता साधक ना कर्मभोगाच्या, ना कर्माच्या, ना कर्मबंधनाच्या, ना कर्मेंद्रियांच्या अधीन होतो. अर्थात तो सदा अधिकारी स्थितीत स्थित असतो. अशा अधिकारी आत्म्याला कोणतेही भौतिक सौंदर्य आकर्षित करू शकत नाही. तो केवळ सर्वात सुंदर अशा परमात्म्याला तिसऱ्या नेत्राने पाहात असतो. त्याच्या चर्मचक्षुंची दृष्टीही आत्मिक व अलौकिक झालेली असते. तो प्रत्येक मनुष्यआत्म्याकडे परमात्म्याचे संतान व भ्रातृत्त्वाच्या दृष्टिकोनातून पाहात असतो. त्याची दृष्टी त्याला कधीही धोका देत नाही. त्याची कर्मेही अत्यंत ज्ञानयुक्त, युक्तियुक्त व योगयुक्त असल्याने तो कुणाच्याही कर्मबंधनात बांधला जात नाही. फलस्वरूप तो स्वतःसाठी संकल्प करतो की, 'चल उड जारे पंछी।' असा संकल्प वारंवार येणे ही आत्म्याची उडती कला आहे हाच कर्मातीत बनण्याचा पुरुषार्थ आहे. त्यासाठी देहाभिमानातून नव्हे तर देहभानातूनही पूर्णतः मुक्त होणे आवश्यक आहे. माझ्या सवयी अशा आहेत, मला हे चालत नाही असे म्हणणे म्हणजे देहभानात अटकणे होय! **कर्मातीत स्थिती प्राप्त होण्यासाठी आत्मारूपी पंछीने देहभानाच्या पिंजऱ्यातून मुक्त होऊन सदा सूक्ष्म व मूलवतनाच्या दिशेने उडत राहिले पाहिजे. कर्मातीत स्थिती अर्थात सदा योगयुक्त, बंधनमुक्त व जीवनमुक्त स्थिती होय!** अशी स्थिती प्राप्त करणाऱ्या आत्म्याला कोणत्याही मनुष्यआत्म्यांची अथवा साधनांच्या आधाराची गरज नसते. त्याच्यासाठी एकच अविनाशी आधार असतो तो म्हणजे त्याचा जीवनमुक्तिदाता प्राणप्रिय परमपिता परमात्मा होय! सदाकाळ व सर्वबंधनातून मुक्त असलेला परमात्माच ज्ञान व योगाच्या आधारे साधकाला कर्मबंधनमुक्त, जीवनमुक्त व कर्मातीत बनवू शकतो. अर्थात त्यासाठी आवश्यकता आहे संपूर्ण समर्पणाची! अर्थात संपूर्ण समर्पित झाल्यावर आत्म्याला कर्मबंधनातून मुक्त करणे ही सर्वस्वी जबाबदारी परमात्म्याची असेल. त्यासाठी साधकाने निश्चिंत रहावे.

**(क्रमशः)**

▶ पान १४ वरून

तडपणाऱ्या तसेच वाट चुकलेल्या, भटकणाऱ्या आत्म्यांना सुख, शांती, आनंद, शक्तीची अनुभूती द्यायची आहे. त्यासाठी गरज आहे ती अनुभवीमूर्त होण्याची. व्यक्ती ठीक झाली तर विश्वही ठीक होईल. माणसे एकमेकांवर निरपेक्ष प्रेम करू लागली की फुलात सुगंधाबरोबर तेजही येईल आणि चांदण्याला तेजासोबत सुगंध प्राप्त होईल. **मी समाजासाठी आहे ही बांधिलकी, सामिलकी प्रत्येकाच्या जगण्याचा स्थायीभाव होईल. तेव्हा या पृथ्वीचा चेहरा स्वर्गीय होईल; जेव्हा स्वार्थासाठी होत असलेले शोषण थांबेल; श्रमाला, सेवेला, त्यागाला, नीतिमूल्यांना प्रतिष्ठा अर्थात सन्मान मिळेल. तेव्हाच या जगाला श्रेष्ठ भविष्य लाभेल. ही वाट खरं तर परमात्म्याने आपल्याला दाखविली आहे.**

प्रेमभावना ही मोठी दौलत आहे. वास्तवात ती प्रत्येकाजवळ आहे, मग तो राव असो व रंक. प्रेम ही निर्मळ अंतःकरणाची अभिव्यक्ती आहे. ती साठविण्यापेक्षा भरभरून उधळायची, लुटायची असते. शायर मुरादाबादीचा एक शेर मोठा बोलका आहे-

**इजलफ्जे मोहब्बत का इतनाही फंसाना है।**
**सिमटे तो दिले आशिक, फैले तो जमाना है।**

प्रेमाच्या एका शब्दाची इतकी जादू आहे की ते सीमित झाले तर प्रिय व्यक्तीच्या हृदयात घर करून राहते, पण त्याचा विस्तार झाला तर ते सारे विश्व व्यापून टाकते. असे दिव्य प्रेम हेच महात्म्यांचे सामर्थ्य असते. ते निर्भय असते कारण तेथे स्वार्थ नसतो. असा महात्मा 'अवघाचि संसार सुखाचा करीन' या मंत्रासारखा जगतो. तो दिवसरात्र दुसऱ्यांसाठी झिजतो. आपल्या जीवनाची होळी तर दुसऱ्यांची दिवाळी करतो. **टॉलस्टॉय म्हणतात त्याप्रमाणे मानवजातीच्या मंगलासाठी महात्मा उभा असतो. प्रेम ही त्याची शक्ती व त्याग हे त्याचे वैभव असते.**

संचयाची भावना ही नुकसान करते. म्हणून दान करावे. दान म्हणजे परिग्रहाचे प्रायश्चित्त. स्थूल दानाबरोबर दानी आपल्या वासनांचेही दान करीत असतो; परंतु दानात लांबी-रुंदीपेक्षा खोली महत्त्वाची असते. त्यानेच वासना क्षीण होतील. दान निरपेक्ष असावे, निर्हेतुक असावे. असे दान ज्ञानाचे, गुणांचे, धनाचे, वेळेचे, सेवेचे, शक्तीचेही असेल; पण प्रत्यक्षात आमचे सारे आयुष्य हे संचयात जाते. आपले काही कुणाला द्यावे हे सुचतच नाही. आपण काय मागावे हेही उमजत नाही. एकदा एका मुलाला ईश्वर प्रसन्न झाला व त्याला म्हणाला, 'तुला काय देऊ?' मुलगा निरागसतेने म्हणाला, 'मला काही नको. फक्त आईस्क्रीम दे.' जवळ एक शहाणा उभा होता. तो त्या मुलाला म्हणाला, 'अरे वेड्या ईश्वराजवळ धन, दौलत, वैभव हे मागायचे. मागून-मागून काय मागितलेस तर आईस्क्रिम!' मुलगा उत्तरला, 'माझ्याजवळ जे नव्हते ते मागितले, त्यात काय चुकले?' ईश्वराजवळ काय मागायचे हे मुलाला नेमके कळले नाही पण सारे आयुष्य संपूनही आम्हास हे कळत नाही.

**म्हणून शिवबाबा म्हणतात, बालक सो मालिक व्हा. भाग्य प्राप्तीचा, ऐश्वर्यवान होण्याचा हा प्रभुमंत्र आहे. 'मीठे बच्चे' या मधाळ शब्दांनी शिवबाबांनी मनामनाचे क्षितिज निर्मळ व विशाल केले. आपण सारे एका परमपित्याची संतान आहोत, वारस आहोत या चिरंतन सत्यातून बाबांनी साऱ्या ब्रह्मांडाच्या दौलतीचे आम्हास धनी केले. बाबांच्या अविनाशी संपत्तीचे आम्ही जन्मसिद्ध अधिकारी आहोत. मास्टर सर्वशक्तिवान हा केवढा मोठा स्वमान त्यांनी आम्हाला बहाल केला आहे. विश्वाचा पोशिंदा आमचा झाला आहे, आता यापुढे वस्तू-वैभव का मागायचे?**

काही भावनांनी सामाजिक स्वास्थ्य धोक्यात येते. धार्मिक असहिष्णुता, जाती-भेद, धर्म-भेद या गोष्टींनी समाजात कटूता येते. सामाजिक तेढ, संघर्ष वाढतो. म्हणून समाजाला संयमाचे, सहिष्णुतेचे, एकतेचे धडे देत, लोकशिक्षण केले तर हे टाळता येईल. सबका मालिक एक आहे. **आपण सारे एकाच परमपित्याची लेकरे आहोत. हा नुसता विचार नाही तर आचार कसा होईल, यासाठी प्रामाणिक प्रयत्नांची गरज आहे. धार्मिक नेत्यांनी उदार विशाल दृष्टी देणारी वक्तव्ये करावीत. भावना दुखावतील असे बोलणे टाळावे. हे विश्वचि माझे घर या व्यापक दृष्टिकोनातून समाजाला दिशा दाखवावी.** आपले सामाजिक वागणे जबाबदारीचे असावे, त्यात अधिकाराचा, धनाचा, ज्ञानाचा मद नसावा. सरळ वृत्ती असावी.

'जग झाले या वन्ही। संत व्हावे गा पाणी।' असे संतवचन आहे. विद्वेषाच्या वणव्यात होरपळणारी माणुसकी पाणी होऊन



**आज शिवबाबांच्या मुलांची ही जबाबदारी आहे की या ईश्वरी ज्ञानाने आध्यात्मिक प्रबोधनाचे कार्य ठायी-ठायी कसे प्रभावी होईल,**

जगवली पाहिजे. **आज शिवबाबांच्या मुलांची ही जबाबदारी आहे की या ईश्वरी ज्ञानाने आध्यात्मिक प्रबोधनाचे कार्य ठायी-ठायी कसे प्रभावी होईल, ही ईश्वरी सेवा शिवबाबांना अभिप्रेत आहे. आध्यात्मिक ज्ञानानेच समाजात शांती स्थापित होईल.** दसरा-दिवाळीला उदंड सेल लागतात. प्रचंड खरेदी होते. सस्ता सौदा झाला या आनंदाच्या भरात आम्ही खूष होतो; पण सच्चा सौदा करायला आम्ही कधी शिकणार?

गुरुनानक बालपणापासून दयाळू होते. एकदा त्यांच्या वडिलांनी त्यांना पैसे देऊन बाजारात पाठविले. रस्त्यात त्यांना भुकेने तडपणारी गरीब माणसे दिसली. नानकांचे बालहृदय कळवळले. त्यांनी खिशातल्या पैशातून त्यांना खाऊ-पिऊ घातले. ती माणसे ढेकर देऊन तृप्त झाली. छोट्या नानकाला आनंद झाला.

घरी परतल्यावर बापाने विचारले, 'अरे नानका, कसला सौदा केलास?' 'पिताजी, मी आज सच्चा सौदा करून आलोय?' नानक उत्तरले. 'सच्चा सौदा?' बापाने आश्चर्याने व कुतूहलाने विचारले. तेव्हा नानकांनी सांगितलेली हकीगत ऐकून बापाला खूप आनंद झाला. **आता संगमयुगात शिवबाबा देखील आपल्याला जगावेगळा सौदा करायला सांगतात. या सौद्यात देणे थोडे आणि घेणे उदंड आहे. आम्हाला आपल्या जवळचा टाकाऊ, व्यर्थ, कचरा फक्त द्यावयाचा आहे, बदल्यात स्वर्गाची बादशाही घ्यायची आहे.**

असा हा 'न भूतो न भविष्यति' सौदा आहे. कचरा घेऊन बाजरा कोण देईल? पण ईश्वर तुमच्याकडचे विकार घेऊन, रोग घेऊन तुम्हाला व्याधीमुक्त देवता बनवू इच्छितो. घराला विन्मुख झालेल्यांना घर देतो. दुःखधामातून सुखधामाची वाट दाखवितो. बेगरचा प्रिन्स करतो. सुदाम्याचे पोहे घेऊन महाल देतो. या सौद्याची किंमत थोडी तर प्राप्ती आभाळाएवढी आहे. तेव्हा या सौदागाराशी सौदा केला तर निश्चितच फायद्यात रहाल. इडा-पिडा टळेल. तुमची ८४ उत्तराची (जन्माची) कहाणी सफल होईल.

जग ईश्वराला सर्वव्यापी समजते. पण खरं तर कलियुगात दुःख, दैन्य हे सर्वव्यापी आहे. दुःखाची भाषा सर्वदूर एकच आहे. पण ही भाषा कळायला मन मोठे पाहिजे. जिवंत असताना आपल्याला जीवनमुक्त व्हायचे आहे. शिवबाबा या जगण्याला मरजीवा म्हणतात. आत्मा जेव्हा या जगात आला तेव्हा मुक्त होता. मग ही बंधने आलीत कोठून? आत्मा ईश्वरदत्त बुद्धी जागोजागी गहाण टाकीत अशुद्ध भावनांचा खेळ मांडीत जगला. त्यात आत्म-स्वातंत्र्य, आपले स्वराज्य गमावून, आत्मा कर्मेंद्रियांचा गुलाम झाला. **आत्मा देहबद्ध झाल्याने मुक्तीची दारे-खिडक्या बंद झालीत. मग आत्म्याच्या गुणांचा सर्वत्र दरवळणारा सुगंध लुप्त झाला तसेच अवगुणांची, दोषांची, विकारांची दुर्गंधी सर्वत्र पसरून आमच्या मनाचे व परिणामतः भावनांचे आरोग्य बिघडून गेले.**

या संक्रमणात भावनांचा बाजार मांडीत फक्त विकारांचीच पूजा झाली. विवेक पारखा झाला. परिणामी फक्त दुःख अन् दुःखच आमच्या वाट्याला आले. आसक्ती, हव्यास, तृष्णा यांच्या अतिरेकाने माणसाची भोगयात्रा सुरू झाली. ही भोगयात्रा संपविण्यासाठी प्रवृत्ती कमी करायची नाही तर काम, क्रोध, लोभ या वृत्ती प्रकर्षाने संपवायच्या आहेत; कारण अध्यात्मात प्रवृत्ती बाधक होत नाही तर वृत्ती बाधक होतात. तेव्हा तमोप्रधान वृत्ती दूर करायच्या आहेत. योगाने, ज्ञानाने हे संभव होईल. जेथे आसक्ती तेथे दुःख आहे. जीवनात विषमता असेल तर तेथेही दुःख आहे. त्याने अधर्म वाढतो. सुखद गोष्टींनी फुलून जाणे व दुःखद गोष्टींनी हताश, उदास, उद्विग्न होणे ही विषमता. सुख-दुःख, निंदा-स्तुती, मान-अपमानात जेव्हा मन राग, मोह, द्वेष आदि विकारांनी प्रभावित न होता स्थिर राहते, विचलित होत नाही, तेव्हाच अनासक्ती येते. त्यामुळे विवेक सुटत नाही. मन शांत होते. सुरक्षित वाटते. ही समता मनाच्या सरलतेतून येते.

आत्म्याची कृतार्थता परार्थ सेवेत असते, त्यागात असते. ती शब्दबद्ध करता येणार नाही. पाण्याचा थेंब तापलेल्या तव्यावर पडला तर तो नाहिसा होतो, अळवाच्या पाण्यावर पडला तर तो मोत्यासारखा चमकतो, परंतु सागरातील शिंपल्यात पडला की त्याचा मोती होतो. परमेश्वराच्या निर्मितीतील हे वैचित्र्य आपण समजून घेतले पाहिजे.

आपल्या श्रेष्ठ भावनांचे आरोग्य राखण्यासाठी म्हणून स्वभावात, विचारात सहिष्णुता आणली पाहिजे. निरंतर भोवती पिंगा घालणाऱ्या मायेने हे आरोग्य बिघडू शकते. हा धोका लक्षात घेऊन ईश्वरी याद अर्थात योगाबरोबरच चांगल्या सवयी जाणीवपूर्वक लावून घ्याव्यात. त्यामुळे आमचे चारित्र्य घडेल, सवयीत कर्मठता नसावी, लवचिकता असावी. सवयींनी वर्तमान आचरणात यांत्रिकता येऊ नये. नवीनता असेल तर जीवन बहारदार होईल. **आपल्या चांगल्या सवयी, श्रेष्ठ संस्कार हेच आमच्या स्व-परिवर्तनाचे दर्पण आहेत. स्व-परिवर्तनाची नांदी आहे. स्व-परिवर्तनातून विश्व-परिवर्तन घडेल हे विधीविधान आहे. पवित्र स्वर्ग निर्मिती ही परमपिता परमात्म्याची मनीषा आहे. स्वप्न नव्हे वास्तव आहे. प्रत्येक कल्पात आपणही परमात्मा पित्याची मनीषा साकार करण्यासाठी मदतगार बनतो, हेच आपले महान भाग्य आहे.** ■



# मनाला सुमन बनवा.....

- बी.के.मुग्धा तांबे, नाशिक

मन ही संकल्पना विविध प्रकारे मांडली गेली आहे. त्यातील काही गोष्टी रूपकात्मक आहेत. जसे बहिणाबाईंनी मनाला शेतात शिरणाऱ्या ढोराची उपमा दिली आहे. ज्याप्रमाणे ढोर हे वारंवार हाकलूनही शेतात येतच राहते; त्याप्रमाणे मनाला कितीही आवरण्याचा प्रयत्न केला तरीही ते भरकटतच राहते. मनाला पाखरू म्हटले आहे. आकाशात स्वच्छंदपणे विहार करणाऱ्या पाखराप्रमाणे मनही स्वच्छंदपणे विहरतच असते. मनाला विशाल सागराची उपमाही दिली गेली आहे. मनाला मंदिर अथवा गाभाराही म्हटले आहे. मनाला पिसारा फुलवून नाचणाऱ्या मोराची उपमाही दिली आहे. मला आठवतय माझे मामा स्वतःला आध्यात्मिक मार्गातील एक अभ्यासक समजायचे. त्यांनी आम्हाला सांगितले होते, मन म्हणजे मेंदूमधील एका विशिष्ट ठिकाणी निर्माण होणारी संवेदना जी विज्ञानाच्या (शरीरशास्त्राच्या) आधारे समजून घेता येत नाही तर त्यासाठी अध्यात्माचा अभ्यास करावा लागतो. त्या नकळत्या वयात असे अगम्य ऐकायला मजा वाटायची पण समजायचे काहीच नाही.



**अध्यात्मात देखील मन ही संकल्पना वेगवेगळया प्रकारे स्पष्ट केली आहे. ''मन एवं मनुष्यानाम् कारणं बंध मोक्षयेत'' या सुभाषितानुसार मन हे व्यक्तीला बंधनात अडकवू पण शकते किंवा मुक्त देखील करू शकते.** संत ज्ञानेश्वरांनी मनाला पाऱ्याची उपमा दिली आहे. जसा पारा हातात उचलता येणे कठीण आहे तसेच मन देखील ताब्यात ठेवणे कठीण आहे. कवी रुमीने मनाचा शोध घेताना एका कवितेत म्हटले आहे की मी आयुष्यभर दरवाजा वाजवत होतो (मनाचा), मला जाणून घ्यायचे होते, आत कोण आहे. शेवटी जेव्हा दरवाजा उघडला तेव्हा माझ्या लक्षात आले की मी आतूनच दरवाजा वाजवत होतो. अशा रितीने मनाला दरवाजाची उपमा दिली आहे. दरवाजाचा विचार करायचा झाला तर त्याचे अनेक प्रकार आहेत. काही दरवाजे एकाच दिशेने उघडणारे असतात. अशा मनस्थितीच्या व्यक्ती अंतर्मुखी असतात, तर दोन्ही बाजूला उघडणाऱ्या दरवाजासारख्या व्यक्ती बहिर्मुखी असतात. काही दरवाजे सहजतेने उघडतात तर काही दरवाजे उघडणे अवघड असते. सहजतेने उघडणाऱ्या दरवाजासारख्या व्यक्ती मोकळया मनाच्या (open minded) असतात, तर अवघड उघडणाऱ्या दरवाज्यासारख्या व्यक्ती आतल्या गाठीच्या असतात. मनरूपी दरवाजातून आत येणाऱ्या व बाहेर जाणाऱ्या गोष्टींवर लक्ष ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. अनेक कार्यालयांमधील दरवाजावर 'परवानगी शिवाय आत येऊ नये' असे वाक्य असते. याचा आध्यात्मिक अर्थ असा आहे की श्रेष्ठ व सकारात्मक संकल्पांनाच आत प्रवेश आहे.

आत्मारूपी राजाच्या राजवाड्याचे ते राजद्वार म्हणजेच श्रेष्ठ संकल्पांचे उगमस्थान. चोर वाटेने प्रवेश करणाऱ्या

**कवी रुमीने मनाचा शोध घेताना एका कवितेत म्हटले आहे की मी आयुष्यभर दरवाजा वाजवत होतो (मनाचा), मला जाणून घ्यायचे होते, आत कोण आहे.**



**''तोरा मन दर्पण कहलाए, भले बुरे सारे कर्मों को देखे और दिखाए''... आरशात स्वतःच्या छबीला बघण्यापेक्षा मनरुपी दर्पणात स्वतःला बघा, ज्यात सर्वच  चांगल्या-वाईट कर्मांचे प्रतिबिंब दिसेल.**

गोष्टी म्हणजे नकारात्मक व व्यर्थ विचार. पूर्वी किल्ल्यांची प्रवेशद्वारे भक्कम असत व त्यावर अणकुचीदार मोठे खिळे लावलेले असत, जेणेकरून शत्रूच्या सैन्याला त्यातून सहज प्रवेश करता येऊ नये. आपल्या मनाचा दरवाजाही असाच भक्कम व सुरक्षित असेल तर आत्म्याचे शत्रू म्हणजेच विकार त्यातून प्रवेश करणार नाहीत. इवलेसे रोप लावियले द्वारी, तयाचा वेलू गेला गगनावरी... मनरूपी दरवाजात सकारात्मक विचारांचे रोप लावले तर सकारात्मकतेचे वातावरण निर्माण होईल.

दरवाजाप्रमाणे मनाला खिडकीचीही उपमा दिली आहे. एकदा एका कुटुंबाच्या शेजारील घरात एक नवीन परिवार राहण्यास येतो. घरातील स्त्रियांची चौकस नजर त्या नवीन परिवारावर लक्ष ठेऊन असते. नवीन शेजारीण बरेचसे कपडे धुऊन बाहेरील दोऱ्यांवर वाळत टाकते. तिची शेजारीण ते आपल्या घराच्या खिडकीतून बघते व विचार करते, कपडे किती अस्वच्छ धुतले आहेत! असे रोजच घडते. एक दिवस ती आपल्या पतीला ही गोष्ट सांगते की नवीन शेजारीण कपडे खूपच अस्वच्छ धुते. पती जेव्हा खिडकीतून बाहेर बघतो तेव्हा त्याच्या लक्षात येते की अस्वछता कपड्यांवर नाही तर आपल्याच खिडकीच्या काचांवर आहे. **वाचकहो, आपल्या मनरूपी खिडकीवर देखील अनेक पूर्वग्रहांची, संकल्पनांची जळमटे साठली असतील तर आपल्यालाही इतरांच्या गोष्टी अशाच अस्वच्छ दिसतील. त्यामुळे दृढ संकल्पांच्या झाडूने मनावरील ही जळमटे साफ करणे आवश्यक आहे.**

दिवसभर आपण आरशामध्ये स्वतःचे प्रतिबिंब अनेकदा बघतो. पण कवी म्हणतो, ''तोरा मन दर्पण कहलाए, भले बुरे सारे कर्मों को देखे और दिखाए''... आरशात स्वतःच्या छबीला बघण्यापेक्षा मनरुपी दर्पणात स्वतःला बघा, ज्यात  सर्वच  चांगल्या-वाईट कर्मांचे प्रतिबिंब दिसेल. ज्यात सुखाची फुले, कळ्या असतील तर दुःखाचे काटेही असतील. तेच खरे आपले प्रतिबिंब असेल. आरसा जितका स्पष्ट तितकी त्यातील प्रतिमाही स्पष्ट. गालीबचा एक सुंदर शेर आहे ''**जिंदगीभर हमसे एकही खता हुई, जिंदगीभर हमसे एकही खता हुई, धूल चेहरे पर थी, और हम आइना साफ करते रहे**'' खरोखर आपण स्वतःच्या मनरूपी दर्पणात बघून क्वचितच स्वतःमध्ये परिवर्तन करतो. एरवी इतरांच्याच प्रतिमा त्यात शोधत राहतो.

आरशांचेही विविध प्रकार आहेत. काही आरसे अंतर्गोल असतात तर काही बहिर्गोल. आरशाच्या प्रकारानुसार आपली प्रतिमा त्यात दिसते. काही आरशांमध्ये आपण फार उंच दिसतो तर काहींमध्ये अगदी बुटके. मन दर्पणाचेही असेच आहे. कधी आपली प्रतिमा आपल्याला प्रत्यक्षतेपेक्षा जास्त श्रेष्ठ ठरवते तर काही वेळा न्यूनगंड निर्माण करते. बहिर्गोल आरशात प्रतिमा वाजवीपेक्षा मोठी दिसते म्हणून त्यांचा वापर भिंग बनविण्यासाठी होतो. मन देखील जर बहिर्गोल आरशाप्रमाणे असेल तर आपली प्रतिमा त्यात नेहमीपेक्षा मोठी दिसेल. परिणामी आपल्यात अहंकार जोपासला जाईल. त्याउलट जर मनरूपी दर्पण अंतर्गोल आरशाप्रमाणे असेल तर त्यात आपली प्रतिमा आपल्याला वाजवीपेक्षा लहान दिसेल; ज्यामुळे न्यूनगंड निर्माण होईल. तुकाराम महाराजांनी म्हटले आहे ''नाही मन निर्मळ, काय करील साबण'' तसेच ''मन है चंगा, तो कावट मे गंगा'' असे ही म्हणतात.

मनात विचार तर येणारच. त्या विचारांवर विजय मिळवण्यासाठी विविध मार्ग सांमितले जातात. एक म्हणजे मनाचे 'दमन' करा अर्थात येणाऱ्या विचारांना दाबून अथवा दडपून टाका. पण दमन झालेले विचार परिस्थितीनुरूप जास्त प्रबळ होऊन बाहेर पडतात. म्हणूनच विचारांचे 'वमन' करा अर्थात ते बाहेर काढून टाका. पण त्यावेळी विचारांची गुणवत्ता बदलता येत नाही. अजून एक प्रवाह असे सांगतो की मन 'अमन' करा म्हणजेच मन निर्संकल्प करा. पण मनात विचार आणायचा नाही हा देखील एक विचारच आहे. **म्हणजेच मनाच्या बाबतीत दमन, वमन वा अमन करून उपयोग नाही. त्याकरिता मनाला 'सुमन' करणे अर्थात मनात चांगले सकारात्मक विचार निर्माण करणे व मन 'शमन' करणे हे योग्य आहे कारण सकारात्मक विचारांमुळे मन लवकर शांत होईल आणि मग मनरूपी चमन (बगीचा) बहरेल. कारण म्हणतात ना ''मन करा रे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण''**

**या सर्वातून एकच गोष्ट स्पष्ट होते की मन जितके स्थिर, शांत तितके व्यक्तिमत्व सात्विक बनेल.**

(संदर्भ ब्र.कु. डॉ. सचिन परब यांच्या मनाचे श्लोक या 'ई टिव्ही मराठी' वरील मालिकेच्या आधारे)

■



# भक्तीचे फळ ज्ञान, मज लाभले, राजयोगाने जीवन, धन्य झाले...(अनुभव)

**- ब्र.कु. इंदूमाता, मालेगाव-कॅम्प (नाशिक)**

माझे वडील भक्तिमार्गात वारकरी संप्रदायाचे होते. त्यामुळे घरातील वातावरण भक्तिमय होते. बालपणापासून माझ्यावर देखील तेच संस्कार घाले होते. मी नेहमी विचार करीत असे की या विश्वात अशी एकही वस्तू नाही, जी मी निर्माण केली आहे. कर्ता करविता तो एक भगवंतच आहे, सृष्टी निर्माण करणारा तसेच पालनहार तो भगवंतच आहे. त्यामुळे भगवंतावर माझी अतूट श्रद्धा होती. लहानपणापासूनच मी गोकुळाष्टमीचा उपवास करत होती.

मोठे झाल्यानंतर मी श्रीमद्‌भगवत्‌गीता, ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत इत्यादी बरेच ग्रंथ वाचले. गीता मला फारशी समजत नव्हती. परंतु वाचायला आवडायची. श्रीकृष्ण भगवंतांनी गीता अर्जुनाला सांगितली, अशी माझी श्रद्धा असल्याने, श्रीकृष्ण भगवान आहेत, ही गोष्ट माझ्या मानसपटलावर बिंबली होती, **परंतु गीतेतील बऱ्याच गोष्टी मनाला मात्र पटत नव्हत्या. उदा. श्रीकृष्ण जर भगवान आहे तर मग तो सर्वव्यापी कसा? आणि जर तो अर्जुनात सुद्धा व्याप्त आहे तर अर्जुनाला त्याने गीताज्ञान सांगायची गरजच काय? दुसरी गोष्ट म्हणजे कुरुक्षेत्रावर दोन्ही पक्ष युद्धासाठी सज्ज असतांना, भगवान श्रीकृष्णाने १८ दिवस गीता सांगितली. मग ती एकट्या अर्जुनालाच का सांगितली? तिसरी गोष्ट म्हणजे गीता ज्ञानामुळे कुठल्या सत्‌धर्माची स्थापना झाली? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे मला नंतर ईश्वरी ज्ञानातून प्राप्त झाली.** परंतु भक्तिमार्गात मला स्वप्नात का होईना श्रीकृष्णाचे दर्शन झाले होते, याचा मला खूप आनंद होता. त्याविषयीचे अनुभव पुढीलप्रमाणे-



ऑक्टोबर १९९८ च्या भल्या पहाटे स्वप्नात मी पाहिले की सागरासमान मोठ्या जलाशयात श्रीकृष्ण उभे आहेत व बासरी वाजवीत आहेत. स्वप्नातच मी सर्वांना सांगत होते की चला, श्रीकृष्ण भगवंताचे दर्शन घ्या नंतर पुन्हा नोव्हेंबर १९९८ च्या पहाटे स्वप्नात पाहिले की श्रीकृष्ण सागरकिनारी बासरी वाजवत आहे व मला बोलवत आहे. पुढे डिसेंबर १९९८ च्या पहाटे मी पाहिले की श्रीकृष्ण जन्मोत्सव चालू आहे. मी अतिशय उत्साहात नाचत आहे व सर्वांना प्रसाद वाटत आहे. मी उठून पहाते तर कुणीच नव्हते. तरी श्रीकृष्णाचे दर्शन घडल्याने, दरवेळी मला अतिशय आनंद होत असे.

आणखी एक विशेष अनुभव म्हणजे २३ सप्टेंबर १९९८ रोजी सायंकाळी ४ वाजता मी गोंदवलेकर महाराजांच्या प्रवचनाचे पुस्तक वाचत होते. अचानक आकाशातील ताऱ्याप्रमाणे प्रकाश समोर चमकला. त्यावेळी मला हे काहीच कळले नाही परंतु आता ईश्वरी ज्ञानामुळे लक्षात आले की, आपले निराकार परमपिता शिव परमात्मा हे ज्योतिर्बिंदू स्वरूप आहेत. हे निरनिराळे अनुभव मला जणू हे सुचवीत होते की मुली, लवकरच तुला तुझे प्राणेश्वर शिवबाबा भेटणार आहेत. म्हणतात ना की भगवंताच्या भेटीची देखील वेळ यावी लागते. त्यानुसार २००५ मध्ये दिवाळीच्या दिवशी शेजारच्या माताजी भेटल्या, तेव्हा मी त्यांना विचारलं की तुम्ही रोज कोठे जाता? त्या म्हणाल्या की मी जेथे जाते तेथे तुम्ही याल का? मी त्यांना म्हटले की भगवंताविषयी सत्संग असेल तर मी नक्कीच येईन. मध्यंतरी तब्येत बरी नसल्याने मी जायला तयार झाले नाही परंतु ६ डिसेंबर २००५ रोजी मी त्यांच्याबरोबर सेंटरला गेले. सर्व सेंटर पाहिल्यावर मी बाबांच्या कमऱ्यात गेले. तेथील ब्रह्माबाबांचा फोटो पाहिल्यावर मी एकदम अवाक झाले. मला असे वाटले की हे तर माझे बाबाच आहेत. डोळे भरून आले व त्या दिवसापासून मी साप्ताहिक कोर्स सुरू केला. बाबांनी जे ज्ञान दिले, ते ऐकून मला अतिशय आनंद झाला होता कारण हे ज्ञान कुठल्याही धर्मग्रंथात वा सत्संगात मी कधीही ऐकले नव्हते. माझ्या वडिलांनी सुद्धा कधीच सांगितले नव्हते. ते ऐकल्यावर माझ्या मनात ही तळमळ उत्पन्न झाली की आपण ज्या सत्संगात जातो, तेथील महिलांनाही हे ज्ञान सांगावे; म्हणून मी सेंटरच्या दीदींना मंदिरातील सत्संगात नेले व त्यांनी सर्व महिलांना प्रदर्शनी समजावून सांगितली.

नंतर मी रोज सेंटरवर जाऊन न चुकता

**आपले निराकार परमपिता शिव परमात्मा हे ज्योतिर्बिंदू स्वरूप आहेत. हे निरनिराळे अनुभव मला जणू हे सुचवीत होते की मुली, लवकरच तुला तुझे प्राणेश्वर शिवबाबा भेटणार आहेत.**

ज्ञानमुरली ऐकू लागली. ईश्वरी ज्ञान व सेंटरचे योगयुक्त वातावरण यामुळे माझे मन भारावून जात असे. शिवबाबा वारंवार मुरलीत समजावत की ''मुलांनो, मी या सृष्टीवर अवतरीत झालो आहे. तुम्ही स्वतः ला आत्मा समजून, माझी आठवण करा म्हणजे तुम्ही पावन बनाल व तुम्हाला २१ जन्मांकरिता स्वर्गीय राज्यभाग्य प्राप्त होईल.'' हे ऐकून मला खरोखर धन्य धन्य वाटत असे. मी मनात निश्चय करायची की बाबा तुम्ही जे श्रीमत द्याल, त्याप्रमाणे मी वागेन. **माझ्या भक्तीचे फळ मला ईश्वरी ज्ञानाच्या रूपाने प्राप्त झाले होते. ईश्वरी ज्ञान व भक्तिमार्गातील ज्ञान यात दिवस-रात्रीचे अंतर आहे हे लक्षात आल्यावर भक्तिमार्गाचे सर्व ग्रंथ मी भक्तांना देऊन टाकले.**

पुढे एक वर्ष ज्ञानात चालल्यानंतर, सन २००६ मध्ये बाबांना भेटण्यासाठी मधुबनला जायची मला परवानगी मिळाली. त्यावेळी मला झालेला आनंद हा खरंच अवर्णनीय असा आहे. पुढील काव्य पंक्तीतून तो भाव अतिशय सुंदरपणे मांडण्यात आला आहे.

**पाके तुझको बाबा, सुख का**
**सार पा लिया।**
**पाने का ना कुछ रहा, जब**
**तुझको पा लिया।**
**वो प्यारे-प्यारे बाबा,**
**वो मीठे बाबा....**

मधुबनचा सर्व परिसर पाहिल्यानंतर स्वर्गाचाच अनुभव आला. संगमयुगात वा सृष्टीवर स्वर्ग कुठे असेल, तर तो मधुबनमध्ये पाहायला मिळतो. मधुबनची पावन भूमी ही परमात्मा अवतरणाची भूमी आहे. पिताश्री ब्रह्माबाबांची चरित्रभूमी, तपस्याभूमी आहे. तेथे शांती व सुखाचा अनुभव भरभरून आला. त्याचवेळी मी भक्तिमार्गातील उपवास, व्रत वगैरे सर्व सोडून आले. ज्यासाठी मी हे सर्व काही करीत होते; तो भगवंत, माझा शिवबाबा मला भेटला होता. त्यामुळे या गोष्टींची आता आवश्यकताच नव्हती. भक्तिमार्गातील माझे भटकणे आता बंद झाले होते. 'पाना था सो पा लिया' अशी अवस्था झाली होती. शिवबाबाच माझा संसार बनला होता. आता फक्त शिवबाबांच्या श्रीमतावर स्वपरिवर्तन करुन, विश्वपरिवर्तनाच्या ईश्वरी कार्यात मला सहयोगी बनायचे होते.

शिवबाबांना भेटून आल्यापासून रोज सकाळी अमृतवेळेचा योग, ज्ञानमुरलीचे मनन-चिंतन, संध्याकाळचा योग या सर्व गोष्टी मी अगदी न चुकता करते. मुख्य म्हणजे दैवी गुणांची धारणा अर्थात सर्वांशी सभ्यतापूर्वक व्यवहार करण्याकडे लक्ष देते कारण स्वपरिवर्तनाद्वारेच विश्व परिवर्तन होणार आहे. शिवबाबांनी माझ्याकडून भक्तिमार्गात चांगले वर्तन करवून घेतले होते. ते आता ज्ञानमार्गातही मला उपयोगी पडत आहे. ईश्वरी ज्ञान प्राप्तीनंतर सारे विश्व आपले कुटुंब बनले आहे. त्यामुळे सर्व आत्मारूपी बांधवांच्या कल्याणाची भावना, सदैव मनात जागृत असते. त्यामुळे आपल्या संबंध-संपर्कातील सर्वांना शिवबाबांचा संदेश देते. **अशा प्रकारचे ईश्वरी सेवेचे लंगर गेल्या कित्येक वर्षांपासून चालू आहे. या सेवेतून मला मिळणारा आनंद खरोखर अवर्णनीय आहे. आपण प्रत्येकाने देखील असे सेवेचे लंगर सतत चालू ठेवावे, हीच सर्व वाचकांना आग्रहाची विनंती आहे. ईश्वरी सेवेतून पद्मांची कमाई होते. फलस्वरूप सद्भाग्याची प्राप्ती होते.** राजयोगाच्या अभ्यासाने आपल्या जीवनातील कर्मभोग नाहीसे होतात. याविषयीचा माझा अनुभव पुढीलप्रमाणे आहे.

सन १९६३ पासून मला पोटाचा आजार होता. अनेक डॉक्टर, वैद्य, हकीम, भगत, पाटे, गंडे, पट्टे हे सर्व उपाय करुनही आजार बरा झाला नाही. माझ्या पोटाचा आजारच कुणाला कळत नव्हता. मला कुणीच बरे करू शकले नाही. परंतु सुप्रीम सर्जन शिवबाबा मिळाल्यानंतर राजयोगाचा अभ्यास करून, आज ७-८ वर्षांपासून तो आजार पूर्णतः गेला आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे राजयोगाच्या नियमित अभ्यासाने, आत्मा पावन बनतो. फलस्वरूप त्याला भविष्यात अनेक जन्मांसाठी 'हेल्थ-वेल्थ-हॅपीनेस' (स्वास्थ्य, संपत्ती व खुशी) चे ईश्वरी वरदान प्राप्त होते. त्यामुळे वर्तमानसमयी प्रत्येकाने राजयोगाचा नियमित अभ्यास करणे, परम आवश्यक आहे. राजयोग ही अशी एकमेव विधी आहे ज्याद्वारे आत्मा पावन बनतो. राजयोग अर्थात स्वतःला आत्मा समजून, प्रेमपूर्वक परमात्मा शिवपित्याची आठवण करणे. मागील ९ वर्षांपासून मी हा अभ्यास करीत आहे. मी शिवबाबांची अलौकिक मुलगी आता ९ वर्षांची आहे; **परंतु लौकिक दृष्ट्या ७२ वर्षांची आहे. तथापि राजयोगाच्या नियमित अभ्यासाने इतकी शक्ती, उमंग-उत्साह प्राप्त होतो की मला थकवा कधी येतच नाही. मला हे वाटतच नाही की मी वयोवृद्ध झाली आहे. किरकोळ आजार झाले तरी ते योगवलाने व थोडयाशा औषधोपचाराने बरे होतात. शिवबाबा माझा सदा साथी आहे. त्यामुळे प्रत्येक पावलावर कल्याण सामावलेले आहे. माझ्या इतकी पद्मापद्म भाग्यवान मीच आहे, हा नशा व खुशी मला सदैव असते.** ज्या भगवंताला भेटण्यासाठी मी लहानपणापासून तळमळत होते तो इतक्या सहज भेटेल, याची मला कल्पनाच नव्हती. आता मला हे लक्षात आले की प्रत्येक कल्पात माझे बाबा, मला असेच भेटणार व माझे जीवन धन्य धन्य करणार! त्यामुळे सदैव हेच गीत माझ्या मनी असते-

**धन्य धन्य हो गये,**
**हम प्रभु को भा पाये।**
**गा रही है जिंदगी,**
**काम उनके आ गये।।**

■